


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# मुंबईत ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर

## रितू तावडे भाजपच्या पहिल्या बिनविरोध महापौर; संजय घाडी उपमहापौर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्वाधिक संख्याबळ मिळविल्यानंतर आता मुंबईच्या महापौरपदी भाजपच्या नगरसेविका रितू तावडे यांची बिनविरोध निवड झाली असून उपमहापौरपदी शिवसेनेचे (शिंदे) संजय घाडी यांची निवड झाली. शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीने महापौर – उपमहापौरपदी उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने तावडे बिनविरोध विजयी झाल्या. याबाबत ११ जानेवारी रोजी महापालिकेच्या सभागृहात अधिकृत घोषणा करण्यात येईल. गेल्या काही दिवसांपासून महापौर निवडीबाबत सुरू असलेल्या तर्क-वितर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे.

अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात भाजप – शिवसेना (शिंदे) महायुतीतर्फे भाजप नगरसेविका रितू तावडे यांच्या नावाची महापौरपदासाठी घोषणा करण्यात आली. मुंबई महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत घाटकोपरमधील प्रभाग क्रमांक १३२ मधून रितू तावडे विजयी झाल्या आहेत. मुंबईच्या महापौर पदाची





उमेदवारी दाखल करण्याची मुदत शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ पर्यंत होती. भाजप – शिवसेना (शिंदे) महायुतीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नवनिर्वाचित नगरसेवक शनिवारी महापालिका मुख्यालयात दाखल झाले. मंत्री मंगलप्रभात लोढा, भाजप मुंबईचे अध्यक्ष अमित साटम, माजी खासदार मनोज कोटक, मुंबई महापालिकेतील गटनेते गणेश खणकर, शिवसेनेचे (शिंदे) सरचिटणीस राहुल शेवाळे, प्रवक्ता शितल म्हात्रे, महापालिकेतील गटनेते अमेय घोले आदी उपस्थित होते.

अमित साटम यांनी महापालिकेतील भाजप कार्यालयात महापौरपदाची उमेदवारी रितू तावडे यांना देण्यात येत असल्याची, तर राहुल शेवाळे यांनी उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड केल्याची घोषणा केली. त्यांनतर शक्तिप्रदर्शन करत रितू तावडे यांनी सूचक गणेश खणकर व अनुमोदक अमेय घोले यांच्या साक्षीने महानगरपालिका सचिवांकडे नामनिर्देशनपत्र सादर केले. त्याचवेळी उपमहापौरपदी निवड झालेले संजय घाडी यांनी सूचक अमेय घोले व अनुमोदक गणेश खणकर यांच्या साक्षीने नामनिर्देशनपत्र सादर केले.

शिवसेना (ठाकरे) पक्षाने संख्याबळाच्या अभावामुळे महापौर निवडणुकीच्या रिंगणात उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. उमेदवारी अर्जाबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी मातोश्रीवर बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीतील चर्चेनंतर पक्षाने हा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार) भूमिका अद्याप स्पष्ट नाही. त्याच वेळी शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीचे संख्याबळ ७१ वर पोहोचले आहे. काँग्रेसने युतीला पाठिंबा दिला तरी युतीचे संख्याबळ ९५ वर पोहोचेल. एआयएमआयएम, समाजवादी पार्टी यांनी शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीला पाठींबा दिला तरी संख्याबळ १०५

होते. त्यामुळे या निवडणुकीत उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी, शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीला मुंबई महानगरपालिकेत विरोधकांची भूमिका पार पाडावी लागणार आहे. दरम्यान, निवडणुकीच्या प्रचारात मुंबईचा महापौर हिंदू व्यक्ती होईल असे वक्तव्य भाजप नेते करीत होते. शिवसेनेकडून (ठाकरे) मराठी व्यक्ती महापौर होणार असे वारंवार सांगण्यात येत होते. संख्याबळाच्या जोरावर भाजपने महापौरपदासाठी मराठी व्यक्तीला उमेदवारी दिली आहे. आता कोणताही अपशकून व्हायला नको, म्हणून आम्ही या निवडणुकीत उमेदवार उभा केलेला नाही, असे माजी महापौर आणि शिवसेनेच्या (ठाकरे) गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी स्पष्ट केले.

### मुंबईमधील भाजपचा दुसरा महापौर

महाराष्ट्रात झालेल्या पुलोद प्रयोगानंतर राजकीय समीकरणे बदलली. या पार्श्वभूमीवर त्यावेळी झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेले भाजपचे नगरसेवक प्रभाकर पै यांच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडली. १९८२-८३ या कालावधीत त्यांनी महापौर पदाची धूरा सांभाळली. आता सुमारे ४४ वर्षांनंतर पुन्हा एकदा मुंबईच्या महापौरपदी भाजपच्या नगरसेविका रितू तावडे विराजमान होणार आहेत. शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीने महापौर पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज न भरल्यामुळे रितू तावडे बिनविरोध निवडून आल्या आहेत. परंतु याबाबतची अधिकृत घोषणा ११ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

भाजपने मुंबईत सत्ता मिळवण्यासाठी गेल्या काही वर्षांत दीर्घकालीन, टप्प्याटप्प्याने आखलेली रणनीती महापालिका निवडणुकीत यशस्वी ठरली. महापालिका निवडणुक २०१७ पासून भाजपने मुंबईत संघटनात्मक बांधणीवर भर दिला. प्रभागनिहाय कार्यकर्ते, बूथ-स्तरावरील यंत्रणा, स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आंदोलन व पाठपुरावा, तसेच नगरसेवक व पदाधिकाऱ्यांना सक्रिय ठेवण्याची भूमिका घेतली. २०२२ नंतर राज्यातील सत्ताबदलानंतर भाजपने मुंबईतील राजकीय संधी ओळखत मित्रपक्षांशी जुळवून घेणे, विरोधकांतील फाटाफूट, आणि महापालिकेतील निर्णयप्रक्रियेत प्रभाव वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले. प्रशासकीय राजवटीच्या काळातही भाजपने मुंबईतील नागरी प्रश्न, विकास प्रकल्प आणि कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेतली. सातत्य आणि योग्य वेळ साधत आखलेल्या रणनीतीमुळे मुंबईच्या महापौरपदी भाजपचा चेहरा बसविण्याचे पक्षाचे स्वप्न अखेर पूर्ण झाले.

## थोडक्यात...

### बांगलादेशी तरुणीचं गुपित महिला हवालदाराला भोवलं?

पुणे (समर्थ गांवकरी) : शहराच्या मध्यवस्तीतील बुधवार पेठ ही केवळ वेश्यावस्तीसाठीच नाही, तर तिथल्या गुंतागुंतीच्या गुन्हेगारीसाठीही ओळखली जाते. मात्र, जेव्हा कायद्याचे रक्षकच गुन्हेगारांशी हातमिळवणी करतात, तेव्हा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. फरासखाना पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील महिला हवालदार मनीषा पुकाळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. 2023 मध्ये एका मानवी तस्करीच्या जाळ्यातून एका अल्पवयीन बांगलादेशी मुलीला पुण्याच्या बुधवार पेठेत आणले गेले. तिला बळजबरीने वेश्या व्यवसायात ढकलण्यात आले. ही मुलगी जेव्हा मदतीच्या आशेने हवालदार मनीषा पुकाळे यांच्याकडे पोहोचली, पण त्यांनी मदत केली नाही. पुकाळे यांनी त्या मुलीची माहिती वरिष्ठांपासून जाणीवपूर्वक लपवून ठेवली. धक्कादायक बाब म्हणजे, केवळ माहिती लपवली नाही, तर संबंधित पीडित तरुणीकडूनच पैसे घेतल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. ही धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांनी पुकाळे यांच्या निलंबनाचे आदेश दिले.

### राज्यभर पुन्हा 'एसटी' बंद राहणार

पुणे (समर्थ गांवकरी) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांच्या मासिक भत्त्याबाबत राज्य सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यभर एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे. केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य सरकारच्या अर्थ विभागाने 11 डिसेंबर 1998 रोजी एसटी महामंडळातील आगारांची शहरनिहाय अ 1, अ, ब 1, ब 2 अशी वर्गवारी केली. त्यानुसार 'अ 1' वर्गवारीतील एसटी कर्मचाऱ्यांना दरमहा 300 रुपये, 'अ' वर्गातील कर्मचाऱ्यांना सहा हजार रुपयांपेक्षा जास्त मूळ वेतन असल्यास कर्मचाऱ्यांना 240 रुपये मासिक भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## मतदान संपलं अन् ईव्हीएम मशीन चक्क ढाब्यावर आढळल्या

**सोलापूर: (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी शनिवारी मतदान पार पडले. संपूर्ण राज्यात शांततेत मतदान होत असताना, सोलापूरच्या मोहोळमध्ये मात्र एका खळबळजनक घटनेने प्रशासनाची झोप उडवली आहे. मोहोळ शहराजवळील एका खाजगी हॉटेल आणि बारच्या आवारात चक्क ईव्हीएम मशिन आढळून आल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. शनिवारी मतदान प्रक्रिया संपल्यानंतर प्रशासन यंत्रणा मशिन जमा करण्यात व्यस्त असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांना मोहोळजवळील 'स्वराज्य बार अँड हॉटेल' परिसरात काही संशयास्पद हालचालींची माहिती मिळाली. पाटील यांनी कार्यकर्त्यांसह तातडीने तिथे



धाव घेतली असता, बारच्या परिसरात काही व्यक्तींकडे ईव्हीएम मशिन असल्याचे दिसून आले. एका बाजूला मतपेट्यांची सुरक्षा कडेकोट असणे अपेक्षित असताना, दुसऱ्या बाजूला त्या चक्क ढाब्यावर आढळल्याने मोठा पेच निर्माण झाला. उमेश पाटील यांनी हा सर्व प्रकार आपल्या कॅमेऱ्यात कैद करत निवडणूक यंत्रणेला जाब विचारला.

## दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाचा निर्णय सुनेत्रा पवार घेणार का?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळली आहे. यादरम्यान अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस विलिनीकरणाची चर्चा जोरात सुरू आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून यासाठी पुढाकार घेण्यात आला, मात्र अजित पवारांच्या राष्ट्रवादीमधील नेत्यांमध्ये काहीसा संभ्रम असल्याचे दिसून येत आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन्ही गट यांचे विलीनीकरण होणार की नाही? या मुद्दा कळीचा बनला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाकडून विलिनीकरणाबाबत





वेगवेगळे दावे-प्रतिदावे करण्यात येत आहेत. आमदार रोहित पवार यांनी १२ फेब्रुवारीला या पत्रकार परिषद घेऊन विलिनीकरणाबाबत काय बोलणी झाली, तसेच इतर माहिती देणार आहेत. यादरम्यान आज राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांचेही महत्त्वाचे विधान केले आहे.सुनेत्रा पवार यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेतला तर आम्हाला विलीनकरण करावेच लागेल, असेही हसन मुश्रीफ म्हणाले आहेत. यावर आता राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुनील तटकरे म्हणाले की, "हसन मुश्रीफ जरूर पक्षाचे वरिष्ठ नेते आहेत. आम्ही सर्वांनी दादांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. शेवटी या विषयाची चर्चा आम्ही सखोलपणाने करू. १० तारखेला मुंबई येथे मंत्रिमंडळाची बैठक आहे. त्यावेळी उपमुख्यमंत्री म्हणून वहिनी (सुनेत्रा पवार) तेथे येतील, तेव्हा या विषयावर नक्कीच चर्चा करू. कदाचित मग त्या दिल्लीतही येऊ शकतील. राष्ट्रपती महोदयांची भेट, पंतप्रधानांची भेट, राज्यसभेच्या त्या सदस्या आहेत, त्या संदर्भातील ज्या संवैधानिक जबाबदाऱ्या आहेत... आम्ही योग्य वेळेला बसून त्याबद्दल निर्णय करू."

# जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी मतदान उत्साहात

## सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत ५१ टक्क्यांहून अधिक मतदान

**सातारा : (समर्थ गांवकरी)**

सातारा जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत किरकोळ वादावादीचे प्रसंगवगळता मतदान शांततेत पार पडले. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये बोगस मतदान आणि मतदान केंद्रात आलेल्या मतदारांना प्रलोभन दाखविण्याच्या कारणावरून वादावादीचे प्रसंग उद्भवले. त्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.

सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ आणि पंचायत समितीच्या १३० गणांसाठी आज सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाचपर्यंत मतदान झाले. जिल्ह्यातील २ हजार ८७७ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबवली गेली. दुर्गम डोंगराळ चकदेव, कांदाटी खोरे, किल्ले प्रतापगड रायरेश्वर आदी भागातही मोठ्या उत्साहात मतदान प्रक्रिया राबविली गेली. मतदान प्रक्रिया सुरळीत राबविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी मोठी शिकस्त केली. मतदान प्रक्रियेसाठी १३ हजारावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

यावेळी भाजपविरुद्ध दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस अशी चुरशीची लढत होत आहे. यामुळे सकाळपासून मतदारांमध्ये मोठा उत्साह होता. २१ लाख ९४ हजार ११० मतदारांपैकी दुपारी दीड वाजेपर्यंत आठ लाख सहा हजार ४६६ मतदारांनी (३६.७६ टक्के) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. दुपारी साडेतीनपर्यंत ११ लाख १९ हजार ४६१ (५१.०२ टक्के) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

सकाळपासून मतदारांमध्ये मोठा उत्साह होता. आज लग्नाची मोठी तिथी असल्याने अनेक ठिकाणी लग्नसोहळेही होते. लग्नाच्या गडबडीतही जावळी, फलटण, कराड तालुक्यात अनेक ठिकाणी नवरदेव आणि नवरी मुलीने लग्नाआधी मतदानाचे पवित्र कार्य पार पाडले. एका मतदान केंद्रावर हळदीच्या पोशाखात येऊन नवरदेवाने मतदानाचा हक्क बजावला. तर, एका ठिकाणी लग्नविधी आटोपताच नववधूने मतदानाचा हक्क बजावल्याचे दिसून आले.



सातारा तालुक्यातील खेड गटात समर्थकांमध्ये वादावादी झाली. या परिसरात तणावपूर्ण वातावरण झाले होते. पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. कराड तालुक्यात बोगस मतदानावरून भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते आमने-सामने आले. कराड तालुक्यातही वडगाव हवेलीत तणावपूर्ण स्थिती पाहून पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली.

मतदानासाठी महिलांमध्येही उत्साह होता. सकाळपासून मतदान केंद्रांवर महिलांच्या रांगा मोठ्या होत्या. वाई तालुक्यातील पसरणी, बावधन, भुईंज येथे मोठी गर्दी होती. नवमतदारांनीही मोठ्या उत्साहात मतदानाचा हक्क बजावला. मोठ्या संख्येने तरुण-तरुणी मतदानासाठी मतदान केंद्रावर हजर झाले होते. गोळेवाडी (ता. कोरेगाव) येथे १०२ वर्षे वय असलेल्या आजोबांनी व ९८ व्या वर्षी आजींनी मतदानाचा हक्क बजावला.

फलटण येथे निवडणुकीच्या तोंडावर रात्री अघोरी बुवांच्या उपस्थितीने व त्यांची गाडी थांबवून चौकशी करण्यात आल्याने गोंधळ उडाला. मतदानापूर्वीच रात्री नाईक निंबाळकर गटांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणाची जिल्हाभर चर्चा झाली. सातारा कृष्णानगर मतदान केंद्रावर तणावाचे वातावरण होऊन मोठी वादावादी झाली.

सातारा, कराड, वाई, फलटण, कोरेगाव, पाटण, खंडाळा, खटाव माण, जावळी, महाबळेश्वर या तालुक्यात सकाळपासून मोठ्या उत्साहात मतदान झाले. सर्वांत जास्त मतदान महाबळेश्वर तालुक्यात झाले आहे. दुपारी साडेतीनपर्यंत या सर्व ठिकाणी ५० टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. एक किरकोळ वादावादीचे प्रसंगवगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले. मतदानासाठी जिल्हाभर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन व पोलीस अधीक्षक तुषार दोशी सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. दुपारी साडेतीननंतर मतदान केंद्रांवर मोठ्या रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये बिघाड झाल्याने मतदान प्रक्रिया थांबविण्यात आली होती. त्यानंतर यंत्र बदलण्यात आले.



# कुंचल्याचा तपस्वी साधक, रंगरेषांचा जादूगार हरपला

(समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय पारितोषिक विजेते ख्यातकीर्त चित्रकार सुरेशचंद्र भाऊराव आवारी (वय ७४) यांचे नुकतेच मुंबई येथे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारतीय कला क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. रंग, रेषा आणि मानवी संवेदनांचा सखोल वेध घेणारा एक संयमी, अभ्यासू आणि समर्पित कलावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे. आवारी यांचे निधन केवळ एका व्यक्तीचे जाणे नसून, एका विचारशील कलापरंपरेचे नुकसान म्हणावे लागेल.



भाऊसाहेब चासकर

आवारी यांचे वडील जुन्या पिढीतील मेहनती आणि हाडाचे प्राथमिक शिक्षक होते. अकोले तालुक्यातील इंदुरी या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा कलाप्रवास संघर्ष, शिस्त आणि सातत्यपूर्ण साधनेचा होता. संगमनेर येथील पेटीट हायस्कूलमध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अहिल्यानगर येथे पहिले एकल चित्रप्रदर्शन मित्रांच्या मदतीने १९७० साली अहिल्यानगर येथे भरवले, ज्यातून त्यांची कलात्मक क्षमता आणि प्रतिभा प्रकर्षाने समोर आली. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी जिद्द सोडली नाही आणि १९७६ मध्ये सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे प्रवेश मिळवला. तेथून त्यांनी जी.डी. आर्ट (पेंटिंग) ही पदवी संपादन केली. 'मुंबई लोकल' या विषयावरील त्यांच्या चित्राला नवी दिल्ली येथील ललित कला अकादमीचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले, हा त्यांच्या कलेचा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान ठरला. पुढे त्यांनी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट येथे काही काळ अध्यापनही केले. कोणताही गाजावाजा न करता सातत्यपूर्ण परिश्रमातून त्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली ओळख निर्माण केली. मुंबईतील प्रतिष्ठित जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये त्यांच्या कलाकृतींचे वारंवार प्रदर्शन झाले, जे त्यांच्या कलेच्या उत्तुंग दर्जाचे द्योतक मानावे लागेल.

प्रदर्शनातून त्यांची अनेक चित्रं कलाचाहत्यांनी जगभर नेली आहेत... आवारी यांची चित्रशैली वैशिष्ट्यपूर्ण, स्वतंत्र आणि विचारशील होती. व्यक्तिचित्रण हा त्यांचा विशेष प्रांत होता. त्यांच्या चित्रांमध्ये ग्रामीण जीवनातील श्रमसंस्कृती, शेतकरी जीवनातील सौंदर्य, निसर्गातील शांत लय आणि मानवी मनातील भावनिक पदर प्रभावीपणे उमटले. त्यांनी रंगांचा वापर केवळ सजावटीसाठी नव्हे, तर अनुभव व्यक्त करण्यासाठी केला. रेषांची शिस्त, रंगछटांची मृदुता आणि विषयातील भावनिक खोली ही त्यांच्या शैलीची ओळख होती. त्यांच्या चित्रांतून ग्रामीण माणसाची अस्मिता, निसर्गाशी असलेले नाते आणि जगण्यातील संघर्ष-अभिमान यांचे सूक्ष्म दर्शन घडत असे. त्यामुळे त्यांची कलासाधना ही केवळ दृश्यात्मक निर्मिती न राहता सांस्कृतिक कलात्मक दस्तऐवज ठरली.

आधुनिक भारतीय कलेचे शिल्पकार एम.एफ. हुसेन यांच्या सान्निध्यात काम करण्याची संधी त्यांना लाभली, ज्यामुळे त्यांच्या कलादृष्टीला वेगळी परिपक्वता मिळाली. राजा रवी वर्मा यांच्या अभिजात सौंदर्यदृष्टीपासून ते वासुदेव गायतोंडे यांच्या अमूर्ततेपर्यंत, दिनानाथ दलाल यांच्या वास्तववादापासून ते एम.एफ. हुसेन यांच्या आधुनिकतेपर्यंत या थोर आणि व्यापक कलापरंपरेत आवारी यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यांच्या कॅनव्हासवर रंग जिवंत वाटत आणि रेषा संवाद साधत असल्याचा अनुभव रसिकांना येत असे.

त्यांच्या कलाकृती बजाज आर्ट गॅलरी, ताज आर्ट गॅलरी, जहांगीर आर्ट गॅलरी तसेच गोवा कला अकादमीच्या कलादालनात जतन आहेत. 'इलस्ट्रेटेड विकली' या प्रतिष्ठित इंग्रजी नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर त्यांनी रेखाटलेली मदर तेरेसा, माजी पंतप्रधान बी.पी. सिंग, पी.व्ही. नरसिंहराव आणि शरद पवार यांची पोर्ट्रेट्स विशेष चर्चेत राहिली. संगमनेर येथील शेतकी सहकारी संघाच्या सभागृहातील इंदिरा गांधी यांचे नऊवारी साडीतील व्यक्तिचित्र, लोणी येथील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, अकोले महाविद्यालयातील के.बी. दादा देशमुख आणि स्वातंत्र्यसैनिक बुवासाहेब नवले यांची चित्रे त्यांच्या कलासाधनेची महत्त्वपूर्ण साक्ष मानली जातात.

मध्यप्रदेशातील भोपाळ येथे इंदिरा गांधी यांच्या संकल्पनेतून पपुल जयकर यांनी उभारलेल्या 'भारत भवन' संग्रहालयात देशातील नामवंत चित्रकारांची प्रत्येकी दोन चित्रे ठेवण्यात आली असून, त्यात सुरेश आवारी यांचीही दोन चित्रे समाविष्ट आहेत. ही बाब त्यांच्या कलेला मिळालेली राष्ट्रीय मान्यता ठसठशीतपणे अधोरेखित करते. कला क्षेत्राबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. माजी केंद्रीय मंत्री मनेका गांधी, संपादक ब्रिटिश नंदी, कवी रामदास फुटाणे तसेच नगर येथील प्रसिद्ध शिल्पकार प्रशांत कांबळे यांच्यासह अनेक विचारवंत-कलावंत त्यांच्या स्नेहवर्तुळात होते.

भारत सरकारच्या विणकर सेवा केंद्रात त्यांनी १२ वर्षे डिझायनर म्हणून काम केले. येवला येथील पैठणी उद्योगातील कारागिरांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला आणि त्यांनी अनेक नक्षीकामांची रचना केली. सोलापुरी चादरींच्या नक्षीकामातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. कला क्षेत्रातील या कार्यासाठी तत्कालीन राज्यपाल पी.सी. आलेक्झांडर यांच्या हस्ते त्यांचा विशेष गौरव करण्यात आला होता.

मोठा लौकिक मिळूनही आवारी यांचे व्यक्तिमत्त्व साधे, नम्र आणि निगर्वी राहिले. ते मितभाषी होते; मात्र त्यांच्या कलेतून ते समाजाशी संवाद साधत राहिले. पुरस्कारांनी सन्मानित होऊनही त्यांनी यशाला अहंकाराचा स्पर्शदेखील होऊ दिला नाही. कुंचल्याचा हा तपस्वी अकोले तालुक्यासाठी अभिमानाची बाब राहिली आहे.

## राजकीय द्वेषापोटी जनतेची दिशाभूल करण्याचा प्रकार

बारड : (समर्थ गांवकरी)

- शेंबोली ग्रामपंचायतीचा 'खोट्या आरोपांचा पॅटर्न'
- राजकीय द्वेषापोटी जनतेची दिशाभूल करण्याचा प्रकार

माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी मंजूर केलेल्या विकासकामांचे श्रेय लाटण्यासाठी शेंबोली ग्रामपंचायतीच्या सरपंच नीता बाळासाहेब देशमुख या बारड ग्रामपंचायतीवर चुकीचे आणि बिनबुडाचे आरोप करत असुन केवळ राजकीय द्वेषापोटी जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रकार असल्याचा पलटवार बारड ग्रामपंचायचे सरपंच मंगल बुरडे यांनी एका पत्रकाद्वारे केला आहे.शेंबोली गायरान लगत असलेल्या गट क्रमांक १६५ मध्ये ग्रामपंचायतचा पॅटर्न निषेधार्ह

बारड ग्रामपंचायतीची मालकीची जागा आहे. या जागेच्या सातबारावर बारड ग्रामपंचायतीचे नाव स्पष्टपणे नमूद आहे. याच गटात जाण्यासाठी गेल्या ४० ते ५० वर्षांपासून वहिवाटीचा रस्ता वापरला जात आहे. ४० वर्षांपूर्वी याच रस्त्याचा

आम्ही जनहिताच्या कोणत्याही कामाच्या विरोधात कधीच नव्हतो मात्र, वैयक्तिक द्वेषापोटी कायदेशीर रस्त्यावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न झाल्यास तो कदापी सहन केला जाणार नाही खोटे आरोप करून विकासकामांचे श्रेय लाटण्याचा शेंबोली ग्रामपंचायतीचा हा 'पॅटर्न' निषेधार्ह आहे, असा आरोप मंगल बुरडे यांनी निवेदनाद्वारे केला.वापर करून बारड ग्रामपंचायतीने तिथे रेस्टहाऊस' बांधले होते ज्याचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत.याच गटात जिल्हा परिषद शाळा (आदर्श शाळा), यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, समाज कल्याण विभाग, राष्ट्रीय

महामार्ग कार्यालय आणि 'वॉटर ग्रीड' यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय योजना कार्यरत आहेत असं सरपंच सौ मंगल बुरडे यांनी एका निवेदनाद्वारे खा अशोकराव चव्हाण,आ. श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

या सर्व प्रकल्पांच्या साहित्याची ने-आण करण्यासाठी हाच एकमेव मुख्य रस्ता असुन अतिक्रमणाला पाठबळ दिल्याचा आरोप सदर गायरान जमीन शेंबोली ग्रामपंचायतीच्या नावावर नसतानाही, राजकीय हेतूने प्रेरित होऊन जनसामान्यांची दिशाभूल केली जात आहे.

## गजानन महाराज प्रगट दिन उत्सवाचे आयोजन

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

'गण गण गणात बोते'च्या जयघोषात अर्धापूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत गजानन महाराज यांचा २४ वा प्रगट दिन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. रविवार, दि.८ रविवारी रोजी होणाऱ्या या सोहळ्यानिमित्त शहरात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची जय्यत तयारी करण्यात आली आहे. ग्रंथपठण व पालखी सोहळा उत्सवाची सुरुवात १ फेब्रुवारीपासून श्री गजानन विजय ग्रंथाच्या पारायणाने झाली असून, ह.भ.प. महालिंग स्वामी,ह.भ.प. सोमनाथ स्वामी हे पोथी वाचन करत आहेत.श्रीगजानन महाराज प्रगट दिनानिमित्त दुपारी ३:०० वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढली जाणार आहे.

## कलाकेंद्रातील असह्य नृत्यांगना महीलेवर कोयत्याने हल्ला

हल्यात महिला गंभीर जखमी

जामखेड: (समर्थ गांवकरी)

तु मला फोनवर बोलत का नाही, माझा नंबर ब्लॉक का केला या रागातुन एकाने नृत्यांगना आसलेल्या महीलेवर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात नृत्यांगना गंभीर जखमी झाली आसुन तीच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी महीलेने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी विरोधात खुनाचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की नृत्यांगना गायत्री तुषार सावंत, रा. वाघोली. जिल्हा पुणे, (हल्ली रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड) ही तीची मैत्रिण मनिषा प्रकाश जावळे हिचे सोबत जामखेड शहरातील तपनेश्वर भागात एकत्र राहते. फीर्यादी ही नृत्यांगनाचे काम करून तीची उपजिवीका भागवते. मागील पाच वर्षा पासून तीचा आरोपी मित्र राहूल अशोक कचरे रा. खळेगाव, ता. गेवराई जि. बीड याचे सोबत मैत्रीचे संबध होते. मात्र सध्या 2024 सालापासून पासुन हे मैत्रीचे संबध सध्या नाहीत. यापुर्वी देखील फीर्यादी महिलेने आरोपी राहुल कचरे त्याच्यावर एक गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवार दि.05 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10.00 वाजण्याच्या सुमारास फीर्यादी महीलेस आरोपी राहुल कचरे याने फोन केला व तो म्हणाला की, तु माझ्याशी फोनवर बोल, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तु जर बोलली नाही तर मी तुला मारीन अशी धमकी दिली होती. त्यावेळी फीर्यादी महीलेने त्याचा फोन कट केला होता.



त्यानंतर शुक्रवार दि. 06 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 02 वाजण्याच्या च्या सुमारास फीर्यादी गायत्री सावंत ही आपल्या रूमवर मैत्रिण मनिषा जावळे हिचेसोबत होती. त्यानंतर मैत्रिण मनिषा हि बालकणीत गेली असता तेथे राहूल कचरे हा दडुन बसला होता. यानंतर तो फीर्यादी गायत्री हीच्या रूममध्ये आला त्यावेळी त्याच्या हातात कोयता होता, तेव्हां तो फीर्यादी गायत्रीस म्हणाला की, तु माझ्याशी का बोलत नाही? माझा नंबर का ब्लॉक केला? असे म्हणून त्याने फीर्यादी महीलेवर कोयत्याने बोटांवर, हातावर व डोक्यावर हल्ला करून गंभीर जखमी केले. त्यावेळी तीची मैत्रिण मनिषा जावळे हिने त्यास मारू नको अशी विनंती केली होती. मात्र फीर्यादीस शिवीगाळ करत म्हणाला की, मी तुला संपवून टाकणार आहे अशी धमकी दिली व निघून गेला.

या प्रकरणी गायत्री तुषार सावंत वय 26 वर्षे धंदा, नृत्यांगना रा. वाघोली ता. जि. पुणे हल्ली रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड जि. अहिल्यानगर हीने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी राहूल अशोक कचरे, रा. खळेगाव ता. गेवराई जि. बीड याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या आरोपी हा फरार आसुन पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वर्षा जाधव या करित आहेत.

## माता रमाई गणगोत पुरस्काराने निर्मलाबाई कांबळे सन्मानित

कंधार : (समर्थ गांवकरी)

येथील सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम यांच्या हस्ते निर्मलाबाई कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त माता रमाई विचारमंच आणि माता रमाई जयंती मंडळ, जवळा दे ता.लोहा जि.नांदेड यांच्या वतीने शनिवारी, दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता माता रमाई गणगोत पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम, तर प्रमुख पाहुणे म्हणून सोनखेड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने,



भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सुभाष खाडे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संरक्षण सचिव आनंद गोडबोले, प्रसिद्ध स्तंभलेख भैय्यासाहेब गोडबोले, प्रसिद्ध साहित्यिका रुपाली वागरे, ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे, माजी सरपंच साहेब शिखरे, जवळा दे चे पोलीस पाटील नितीन गवळी, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रल्हाद मोरे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे, माता रमाई जयती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, उपाध्यक्षा करुणाबाई गच्चे, भीमजयंती मंडळाचे अध्यक्ष भीमराव गोडबोले, सचिव मायाबाई गोडबोले, समता सैनिक दलाच्या केंद्रीय सहाय्यक शिक्षिका तेजस्विनी मस्के, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम यांच्या हस्ते निर्मलाबाई कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, भारताचे संविधान ग्रंथ, पदक, शाल, पुष्पहार, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पत्रकारिता क्षेत्रातील कर्तृत्ववान माता म्हणून हा पुरस्कार देण्यात आला आहे. पत्रकार राजेश्वर कांबळे यांच्या त्या मातोश्री आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शिवघाटाजवळ दुचाकी अपघात

डांग : (समर्थ गांवकरी)

डांग जिल्ह्यातील आहवा–वघई राज्य महामार्गावरील शिवघाट परिसरात आज एक गंभीर दुचाकी अपघात घडला. घाटातील वळणावर दुचाकीस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी घसरून रस्त्याखाली कोसळली. या अपघातात दुचाकीवर प्रवास करणारे दोन्ही युवक गंभीर जखमी झाले. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, माळकरी समाजाच्या भक्ती फेरीसाठी महाराष्ट्रातील कळवण येथून कालीबेल गावाकडे जात असलेले दोन मराठी युवक आहवा घाट मार्गावरील वळणावर अपघातग्रस्त झाले. अपघातात दोघांनाही डोक्याला तसेच शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच आहवाचे सामाजिक कार्यकर्ते (बंटी) सतीशभाई बच्छावे यांनी तत्परता दाखवत तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

## माता रमाबाई यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

किनवट : (समर्थ गांवकरी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी त्यागमुर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त किनवट शहरातील त्यागमुर्ती माता रमाबाई चौक येथे जयंती कार्यक्रम उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार, पोलिस निरिक्षक गणेश कराड, नगरसेविका ललिता मुनेश्वर, बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानिवार यांनी माता रमाबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच रमाबाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या त्याग, संघर्ष आणि समर्पणाच्या कार्याची आठवण यावेळी करण्यात आली. कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी




सांगितले की, माता रमाबाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बाबासाहेब आंबेडकरांना साथ देत समाज परिवर्तनाच्या लढ्यात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या त्याग, संयम आणि समाजावरील प्रेमामुळेच बाबासाहेबांना मोठे कार्य करण्यासाठी बळ मिळाले. त्यामुळे समाजातील महिलांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन शिक्षण, सामाजिक कार्य आणि आत्मसन्मान यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला पोलिस हेड कोन्स्टेबल प्रकाश बोदमवाड, नितिन कदम, शिवा अनंतवार, गंगुबाई परेकार, प्रा. जयश्री भरणे, पुष्पांजली कांबळे, अश्विन भरणे, अनिल कांबळे, विद्या पाटील, विजया खाडे, मयुरी कांबळे, निवेदक कानिंदे, ब्राम्हा एड्के यांच्यासह शहरातील महिला, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी माता रमाबाई यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



## जिल्हा संघटकपदी कैलास पाटील पवळे यांची बिनविरोध निवड

कंधार : (समर्थ गांवकरी)

आज पर्यत शेतकऱ्यासाठी व सामाजिक हितासाठी केलेल्या कामाची दखल घेऊन कैलास पाटील पवळे चिखलीकर यांची क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या नांदेड जिल्हा संघटक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. सघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत ४ फेब्रुवारी रोजी निवड करण्यात आली. यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण मोरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील जाधव,जिल्हा उपाध्यक्ष शहाजी पाटील शिंदे, लोहा तालुका अध्यक्ष पांडुरंग पाटील पवार,मुदखेड तालुका अध्यक्ष साईनाथ पाटील खानसोळे, लोहा सोशल मीडिया प्रमुख वेदांत कोडांवार,ओम पाटील, गोटु पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल कैलास पवळे यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

## नांदेडमध्ये भाजपाच्या पहिल्या महापौर कविता मुळे

उपमहापौर पदी दिपक सिंह रावत यांची निवड निश्चित

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या भाजपच्या पहिल्या महापौर म्हणून कविता मुळे तर उपमहापौरपदी दीपक सिंह रावत यांची निवड निश्चित समजली जात आहे नांदेडमध्ये महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत तर भाजपाकडून महापौर पदासाठी कविता मुळे यांचा तर उपमहापौर पदासाठी दीपक सिंह रावत यांच्या उमेदवारीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे नांदेडमध्ये माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन नांदेड करांनी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले असल्यामुळे या दोघांच्या निवडीचे आता केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे महापौर पदी निवड निश्चित झालेल्या कविता मुळे या प्रभाग क्रमांक २ तरोडा बुद्रुक भागातून भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणुक लढवून विजय झालेले आहेत तर उपमहापौर पदी निवड निश्चित झालेली दीपक सिंह रावत हे प्रभाग क्रमांक १६ वजीराबाद गाडीपुरा या प्रभागातून भारतीय जनता पक्षाने उमेदवारी दिली होती व ते विजयी झाले असून ते नगरसेवक आहेत नांदेड महानगरपालिका महापौर पदाची निवड प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारीपासून सुरू झाली होती उमेदवाराच्या अर्ज आज शुक्रवार




दिनांक ६ फेब्रुवारी रोजी स्वीकारले त्यानंतर दि १० फेब्रुवारी रोजी विशेष सभेत महापौर उपमहापौर पदी निवडले जाणार आहेत यामुळे सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी हे पद राखीव आहे कविता मुळे महापौर पदी तर उपमहापौर पदी यांच्या नावाचे घोषणा औपचारिक रित्या दि १० फेब्रुवारी रोजी होणार आहे महापालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाला नांदेड वाघाळा महानगरपालिकेत स्पष्ट बहुमत मिळाले आहे त्यामुळे भाजपने स्वबळावर ४५ जागा मिळविल्या आहे तर शिवसेना शिंदे गटाने पाठिंबा देऊन ४ नगरसेवक भाजपासोबत आहेत त्यामुळे भाजपा आणि शिवसेना महायुतीची सदस्य एकुण संख्या आता ४९ वर पोहोचली आहे दुसरीकडे महापालिकेत एमआयएम ने १४ जागा मिळवत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवली आहे तर काँग्रेसला १० जागा तर वंचित बहुजन आघाडीला ५ जागा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे २ जागा मिळाल्या तर १ अपक्ष उमेदवारालाही संधी मिळाली आहे महापौर . उपमहापौर निवडण्याची प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर दि ५ फेब्रुवारी रोजी पासून सुरू झाली आहे व महापौर . उपमहापौर पदासाठी अनेक इच्छुकांनी अर्ज विक्री घेतले आहेत दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते ३ या दरम्यान मनपाचे नगर सचिव अजितपाल सिंघ संधू अर्ज दाखल करण्यात आला आहेत महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील कै . शंकरराव चव्हाण सभागृहात दिनांक १० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी तथा पिठासिन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत महापौर पदाची निवडणूक होणार आहे सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या



सभागृहात ही विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येणार आहे महापौर पदासाठी हात वर करून मतदान घेण्यात येणार आहे या नंतर गुरुवारी नगरसेवकांची बैठक घेत महापौर निवडीबाबत नगरसेवक प्रतिनिधीं ची महापौर पदा बाबत ची मते जाणून घेण्यात आली दरम्यान भाजपने प्रदेश कोर कमिटीचे नाव पुढे केले असले तरी खासदार अशोकराव चव्हाण हेच नाव अंतिम करतील तोच महापौर हे मात्र निश्चित मानले जात आहे राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी गुरुवारी नगरसेवकांची बैठक घेतली होती.

# आत्मविश्वास आणि मनाचा खंबीरपणा प्रगतीकडे नेईल

- ग्लोबल नगरी फाउंडेशनचे उपाध्यक्ष रोहित काळे यांचे प्रतिपादन
- अगस्ती महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनात व्यक्त केले विचार

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

'आपली सुरुवात अथवा आयुष्याचा प्रारंभ ही मर्यादा नसावी, स्वप्नांसाठी जागे रहा. पाठपुरावा करा. न्यूनगंड काढून टाकावा. आत्मविश्वास सातासमुद्रापार नेऊ शकतो. प्रवास खडतर असतो, सोपे काहीच नसते.' असे प्रतिपादन ग्लोबल नगरी फाउंडेशन अमेरिका चे उपाध्यक्ष रोहित काळे यांनी केले. अगस्ती महाविद्यालयातील ५० व्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव होते.

भारताचे भवितव्य अणि आत्मविश्वासाचे मोल समजावताना रोहित काळे पुढे म्हणाले, 'प्रयत्नांची पराकाष्ठा आवश्यक आहे, आपणाशीच स्पर्धा करावी. स्वतःला खंबीर करणे हेच आयुष्याचे गमक आहे. आपल्या तारूण्यातील भरारी आपल्या भारताची ताकद आहे. तुमच्यात भारताचे भवितव्य पाहतो. ए आय ची लाट असली तरी लाटेच्या वर रहा. कार्यक्षमता वाढविण्यासाठी आत्मविकास जरुरीचा आहे. आजचा काळ उभारणीची आहे.

भारतीय लोक अनेक क्षेत्रात पुढे आहेत ही अभिमानाची बाब आहे. स्वतःची प्रगती अनमोल आहे. टीम वर्क कायम यशाकडे घेऊन जाते' विख्यात गायक आणि युट्यबर गुर आशीष पाल सिंह यांनी 'आत्मिक ज्ञान तोलामोलाचे असते असे सांगून अगस्ती मुनींनी चिंता मुक्तीची शिकवण जगाला देऊन आध्यात्मिक बळ दिले' असे सांगून विविध हिंदी गीतांचे सादरीकरण केले. त्यांच्या गीत गायनाला विद्यार्थ्यांचा थक्क करणारा प्रतिसाद मिळाला. 'आशियाना साथ तेरे', 'एक कारवा, जाए वहां', 'संदेसे आते है' यांसारख्या गीतांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. शिक्षण अभ्यासक दीपा नायर यांनी आपल्या मनोगतात आत्मविश्वास तसेच परिश्रमाचे महत्व प्रतिपादन केले. अगस्ती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी स्वागत आणि प्रास्ताविक करताना महाविद्यालयातील नव्या युगाच्या जडणघडणीतील विविध उपक्रमांचा तसेच राज्य स्तरावरील विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्रगतीचा उंचावणारा आलेख व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अकोले ता. एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी महाविद्यालयीन प्रगतीत प्राचार्य डॉ. शेळके यांनी पार पाडलेल्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.






शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा 'स्टुडंट्स ऑफ दी इयर' वरिष्ठ महाविद्यालयातील करिष्मा नवनाथ मधे हिला तर कनिष्ठ महाविद्यालयातून दर्शन चौधरी याला प्रदान करण्यात आला. याशिवाय वर्षभर विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेल्या प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. माई मंगेशकर पुरस्कारांसह विद्यार्थ्यांना प्राप्त राष्ट्रीय, राज्य,विद्यापीठ आणि स्थानिक पातळीवर विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या तसेच महाविद्यालयीन पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, खजिनदार धनंजय संत, कार्यकारिणी सदस्य रमेश जगताप, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, पॉलिटिक चे प्राचार्य आर. डी. पल्हाडे, उपप्राचार्य डॉ. साहेबराव गायकवाड, डॉ. अशोक दातीर, प्रा. चांगदेव डोंगरे, प्रा. व्ही. व्ही. वाकचौरे, डॉ. सुनील शिंदे, परफेक्ट च्या प्राचार्या मीना नवले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. श्रीमती महेजबीन सय्यद, प्रा. एन्. टी. आरोटे आणि प्रा. के. व्ही. जाधव यांनी केले.

## टायगर ग्रुपतर्फे वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान व अन्नदान

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

समाजसेवा आणि विधायक कामांचा वारसा जपत, जळगाव टायगर ग्रुपचे प्रमुख सदस्य आणि समाजसेवक सोपान मानकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जळगाव शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. टायगर ग्रुपचे संस्थापक वस्ताद जालिंदर जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. तानाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम पार पडला. रेड प्लस ब्लड सेंटर, जळगाव येथे आयोजित या शिबिरात तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिवसभरात एकूण ३५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपला सामाजिक सहभाग नोंदवला. "रक्तदान हेच श्रेष्ठदान" हा संदेश देत सोपान मानकर यांच्या वाढदिवसाला एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात आली. केवळ रक्तदानच नव्हे, तर या निमित्ताने टायगर ग्रुपच्या वतीने गरजूंसाठी अन्नदानाचा उपक्रमही राबवण्यात आला. जळगाव जिल्हा रुग्णालय, रेल्वे स्टेशन आणि शिरसोली या परिसरातील गरजूंना अन्नवाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला टायगर ग्रुपचे जळगाव शहराध्यक्ष गौरव उमप, गोल्डन मॅन सागर सपके, उपसरपंच आनंद घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच किरण ताडे, पवन रायचंदे, कृष्णा घुगे, कुणाल पाटील सर, राहुल उमप, सागर गायकवाड, पवन कोळी, साई उमप, दिनेश माळी, शुभम उमप, जीतू निंबाळकर, विवेक नेतले, किरण घव्हाणे, अंकुश मराठे, गणेश गोपाल आणि सोपान मानकर मित्र परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसाचा खर्च टाळून समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबवल्याबद्दल टायगर ग्रुपचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## सैनिक शाळा उभारणार

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक यांच्या स्मृतीस शौर्य दिनानिमित्त देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. हदगाव तालुक्यातील तामसा परिसरात शौर्य भूमी म्हणून ओळख असलेल्या नाव्हा गावात निजाम कालीन जहागीरदार राहिलेली आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक यांच्या स्मृतीस नाव्हा येथे सैनिकी शाळा उभारण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही हादगाव तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी दिले. पुढे बोलताना आमदार कोहळीकर यांनी आद्य क्रांतिवीर राजे नोबसाजी नाईक यांच्या निजामविरुद्ध लढा अस्मरणीय असून त्यांच्या या शौर्य गाथेचा पटन वहा म्हणून त्यांच्या स्मरणार्थ नाव्हा येथे सैनिक शाळा उभारण्यासाठी कटिबद्ध.. विशेष योजनेअंतर्गत सांस्कृतिक सभागृह साठी निधी कमी पडू देणार नाही.

## हिमायतनगर तालुक्यात घाणीचे साम्राज्य

### स्थानिक आमदार कदम यांनी लक्ष द्यावे जनतेची मागणी

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर तालुक्यात घाणीचे साम्राज्य शहरातील मुख्य रस्त्यावरील नाल्यातून तुंबलेले नाल्याची घाण पाण्यामुळे घाणीचे साम्राज्य व दुर्गंधी मुळे स्थानिक नागरीक त्रस्त आहेत तर या बाबी कडे स्थानिक आमदार बाबुराव कदम यांनी लक्ष देऊन हे काम पुर्ण करावे जनतेची मागणी घाणीचे दुर्गंधी चे पाणी वाहत असल्यामुळे दिवसें दिवस डासांचे प्रमाण वाढत चालले असून या ठिकाणी राहणाऱ्या सर्व सामान्य नागरीकांच्या अरोग्यास रोगराई निर्माण होत आहे. गावातील अनेक रस्ते खोदून ठेवल्यामुळे. अनेकांना जीवघेणा प्रवास करावा लागला अतिशय अशा बिकट परिस्थिती नगरपंचायत लक्ष देणार का असा सवाल सुजान नागरिकातून करण्यात येत आहे. व पाणी पाणीपुरवठा योजना कधी अमलात येईल आणि कधी हिमायतनगर ला पाण्याची तहान भागल याकडे सर्व जनतेचे लक्ष वेधले आहे. हिमायतनगर मध्ये रस्ते स्वच्छता आणि पाणी या तीन बाबीवर मुलभुत सुविधा नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक कधी लक्ष देतील आणि कधी शहराचा विकास होईल अशा भावना समस्त नागरीकांतुन व्यक्त होत आहेत. गावाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि विकास मात्र अधोगतिकडे चाललेला दिसत आहे मागच्या दहा वर्षापासून प्रशासन लागू असल्यामुळे विकास झालेला नाही पण आता तरी नवनिर्वाचित आमदार बाबुराव कोहळीकर यांनी तरी हिमायतनगरच्या विकासासाठी काहीतरी प्रयत्न करणार का असा सवाल जनतेतून ऐकायला मिळत आहे.




## नांदेड जिल्ह्यात रोजगार हमी योजनेचे कामे ठप्प

### कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे पंचायत समितीत शुकशुकाट

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मागील दहा ते पंधरा वर्षापासून महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत गाव पातळीवर अनेक कामे केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू आहेत. मात्र या कामावर नियंत्रण असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागणी संदर्भात मागील दहा ते पंधरा वर्षापासून राज्य सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संपाची हत्यार उपस्थित केली आहे. मागील सहा ते सात दिवसापासून आझाद मैदानावर संप सुरूच आहे. त्यामुळे रोजगार हमीची सर्व कामे सध्या ठप्प पडली आहेत. नांदेड जिल्ह्यातील सर्वच पंचायत समितीमध्ये नरेगा कक्षाला टाळे दिसत असून गाव पातळीवरील रोजगार हमीचे कामे थंड झाली आहेत. याचा फटका बेरोजगारांना बसत असल्याचे दिसून येत आहे.

केंद्र सरकारच्या वतीने मागील १० ते १५ वर्षाखाली गावामध्ये मजुराच्या हाताला काम मिळावे, मजूर स्थलांतर होऊ नये यासाठी प्रत्येक गावामध्ये तब्बल २६६ कामे प्रस्तावित करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक गावामध्ये शेतकऱ्यांसाठी जलसिंचन विहीर, मातोश्री पानदान रस्ता, शेती रस्ते, शिव रस्ते, जिल्हा परिषद शाळे समोर कंपाऊंड अशी विविध विकासाची कामे मोठ्या प्रमाणात सुरू होती. प्रत्येक गावामध्ये रोजगार हमीची कामे सुरू झाल्यामुळे प्रत्येक गावांमधील मजूर गावात काम करू शकेल, या योजनेतील मागील दहा ते पंधरा वर्षांपासून व्याप्ती वाढत गेली. या योजनेवर कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी यांच्याकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत गेले. यामध्ये प्रामुख्याने एपीओ, तांत्रिक साहयक, अभियंता, संगणक ऑपरेटर, अशा कर्मचाऱ्यांच्या मागणीकडे मागील अनेक वर्षापासून राज्य सरकारने दुर्लक्ष केले. दहा ते पंधरा वर्षांपासून हे कर्मचारी केवळ कंत्राटी पद्धतीने काम करीत आहेत. त्यामुळे हे कंत्राटी कर्मचारी विविध मागणीसाठी सध्या आझाद मैदानावर संप करीत आहेत.



## अर्धापूरातील विजपुरवठा सुरळीत करा

**अर्धापूर: (समर्थ गांवकरी)**

गेल्या पंधरा दिवसांपासून शहरात विजेचा लपंडाव सुरू असून, त्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून. दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होईल, याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. विजेच्या लपंडावावर महावितरण कंपनीने त्वरित तोडगा काढावा,अन्यथा विज वितरण कंपनीच्या कार्यालयावर कंदिल मोर्चा काढून आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते फिदोस हुसेनी यांनी दिला आहे.विज वितरण कंपनीचे अधिकारी व अनेक राजकीय मंडळीचे वास्तव नांदेडला असल्यामुळे हुटावर बसून शेळा हाकालण्याचा प्रकार सुरू आहे.सातत्याने विस्कळीत होत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता तासन्तास वीज गायब होत असल्याने घरगुती कामांसह व्यापार आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही याचा विपरीत परिणाम होत आहे.

## घनसोलीतील जय गजानन सोसायटीवर सिडकोचा हातोडा

### पाणी-वीज तोडून नागरिकांना वेठीस धरल्याचा आरोप!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबईतील घनसोली परिसरातील जय गजानन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीवर सिडको प्रशासनाने अचानकपणे धडक कारवाई करत थेट हातोडा चालवल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

या कारवाईदरम्यान इमारतीतील पाण्याच्या पाईपलाईन, लाईट मीटर तसेच पाण्याची टाकी पूर्णपणे तोडून उद्ध्वस्त करण्यात आली.

या अमानुष कारवाईमुळे सोसायटीतील शेकडो रहिवाशांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पाणी व वीजपुरवठा खंडित झाल्याने लहान मुले, वृद्ध नागरिक आणि महिलांचे प्रचंड हाल होत असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

प्रशासनाच्या या कृतीविरोधात संतप्त नागरिक रस्त्यावर उतरून जोरदार निषेध व्यक्त करत आहेत. "नागरिकांच्या मूलभूत गरजांवर घाला घालण्याचा अधिकार सिडकोला कोणी दिला?" असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. विकासाच्या नावाखाली सामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचा हा प्रकार असून, प्रशासनाच्या संवेदनशून्य कारभाराचा हा जिवंत पुरावा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या घटनेमुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, तात्काळ पाणी व वीजपुरवठा पूर्ववत करावा तसेच बाधित नागरिकांना न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



## बिलोली न.पा.चे माजी उपनगराध्यक्ष गौसोद्दीन कुरेशी यांचे निधन

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

येथील नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष तथा सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते गौसोद्दिन कुरेशी यांचे दि.७ रोजी दुपारच्या सुमारास वयाच्या ६७ व्या वर्षी अल्पशा आजाराने बिलोली येथे निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी दि.८ रोजी दुपारच्या नमाज पठनानंतर बिलोली येथे होणार असल्याचे सांगितल्या गेले.कुरेशी यांच्या सामाजिक कार्याचा विचार केल्यास त्यांची घट्ट अशी पकड तळागाळातील शेवटच्या घटकासोबत होती.ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सचिव विशेषतः कै.गंगाधर रावजी देशमुख कुंदुरकर यांच्या विचारा सोबत शेवटपर्यंत कायम होते. त्यांच्या संकल्पनेतुन बिलोली येथील मंगळवारचा पशु आठवडी बाजारही सुरू झाला आहे.



ज्या ज्या वेळी शहरामध्ये कांही गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले तर स्व.गौसोद्दिन कुरेशी यांचे विचार अनेक वेळा महत्वाचे ठरत असत. ते माजी सेवा निवृत्त जिल्हा न्यायाधिश म.रियाजोद्दिन कुरेशी यांचे बंधू होते.त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ,पुतणे असा परिवार आहे.

## सिडको परिसरात माता रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

माता रमाई आंबेडकर यांची जयंती सिडको परिसरातील अनेक भागात उत्साहात साजरी करण्यात आली तर सिडको परिसरातील रमाई आंबेडकर चारिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने ध्वजारोहण सह भव्य मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तर नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने रमाई आंबेडकर चौक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे अभिवादन करून नवनिर्वाचित नगरसेवक यांच्या विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला.

माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत अकरा ठिकाणी सार्वजनिक भव्य मिरवणूक सकाळपासून परिसरात अनेक भागातील बौद्ध विहार या ठिकाणी ध्वजारोहण व अभिवादन सोहळा व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी सत्कार करण्यात आला.



सकाळी रमाई आंबेडकर चारिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने सकाळी अध्यक्ष श्रीकांत नागणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते.

यावेळी उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, सचिव राजीव वाघमारे, सहसचिव राजु तायडे यांच्या सह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी माता रमाई यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले तर दुपारी भिमवाडी ते माता रमाई आंबेडकर चौक येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली होती,तर सायंकाळी सुप्रसिद्ध गायक रविराज भद्रे व गायीका अंकिता नांदेडकर यांच्या भिमगिताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी संजय घोगरे पाटील,राजु लांडगे,संजय मोरे यांच्या सत्कार करण्यात आला.

वंचित बहुजन आघाडी नांदेड दक्षिण जिल्हा यांच्या वतीने माता रमाई आंबेडकर चौक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी जिल्हा अध्यक्ष शंकर महाजन, अमृत नरंगलकर, विठ्ठल गायकवाड,रवि पंडित, साहेबराव भालेराव, भिमराव बेद्रीकर, महेंद्र सोनकांबळे, सुरेश गजभारे यांच्या सह पदाधिकारी यांनी अभिवादन केले.

नवनिर्वाचित नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी सतिश बसवदे, राजु लांडगे,संजय मोरे, माजी नगरसेविका डॉ.करूणा जमदाडे, यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते प्रेसनजित वाघमारे व समाज बांधवांनी परिसरातील नागलोक बुध्द विहार,नालंदा,जेतवन,सांची,नंदिग्राम, पंचशिल,त्रिरतन बोध्द विहार येथे माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले तर उपस्थित नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांच्या सत्कार करण्यात आला.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या वाघाळा ,गोपाळ चावडी धनेगाव,बळीरामपुर, वसरणी, कौठा ,या ठिकाणी भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली होती,

वसरणी येथील सुजाता बौध्द विहार येथे नगरसेविका सौ दिपाली मोरे, सुलोचना धोंडीबाराव काकडे, अनुराधा राजु पाटील काळे, अभिषेक सौदे यांच्या सह पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी नवनिर्वाचित सत्कार करण्यात आला, जुना कौठा येथील अंजिठा बौध्द विहारात ही माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले तर वाघाळा शाहुनगर येथील शाहुनगर मित्र मंडळ यांच्या वतीने भव्य दिव्य मिरवणूक आयोजन करण्यात आले होते यात महिला मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या,तर सिडको हडको परिसरातील अनेक जयंती मंडळ यांच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली होती.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या आदेशानुसार ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, रेखा काळे,मंगेश नाईक यांच्या सह उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार, महिला पोलिस, पोलीस होमगार्ड यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.



सागराची लाट
उंच उसळली,
तरी आकाशाला
भिडत नसते..
वारं कितीही
घोंगावलं तरी,
दिशांना उलथवत
नसते..
प्रसंगात सामर्थ्य
टिकवणारी व्यक्ती
नेहमी 'विजयी' ठरते..

# 'सहकार महर्षी'

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक
अगस्ति सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते,

## मा.श्री.सिताराम पा.गायकर साहेब

यांना वाढदिवसानिमित्त

## हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-

### आदिवासी सेवा सोसायटी, शेलद

ता.अकोले, जि.अहमदनगर

चेअरमन : श्री.शंकर बाबुराव डगळे

सचिव : श्री.गिताराम तात्याबापू साबळे

सन्मा.संचालक मंडळ
श्री.दत्तात्रय वाळीबा तळेकर,श्री.माधव भाऊसाहेब काळे,
श्री.बाजीराव तुकाराम नवले,श्री.चिमा गोपाळा मधे,
श्री.रामनाथ भाऊ मुठे,श्री.हरिबा निंबा घिगे,
श्री.ज्ञानेश्वर झुंबर बगाड, श्री.विजय श्रावणा घिगे,
सौ.अनुसया गंगाराम घिगे,
सौ.शैला बाळासाहेब घिगे,श्रीमती जनाबाई किसन लकडे

### आदिवासी सेवा सोसायटी मर्या; पैठण

ता.अकोले, जि.अहमदनगर
चेअरमन :श्री.रामा पांडू बुळे
व्हा.चेअरमन : श्री.दत्तु केरु तळेकर
सचिव : श्री.उत्तम साबळे
सन्मा.संचालक मंडळ व सभासद वृंद
कर्मचारी वृंद

### विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या; देवठाण

चेअरमन, व्हा.चेअरमन व
सन्मा. संचालक मंडळ

### आदिवासी सेवा सोसायटी मर्या; कोतुळ, ता.अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर
चेअरमन: श्री.विशाल नामदेव गोडे
व्हा.चेअरमन: श्री.निवृत्ती सखाराम पोखरकर
सचिव: श्री.दादाभाऊ साबळे

सन्मा.संचालक मंडळ
श्री.मनोज शिवनाथ देशमुख, श्री.सयाजी मुरलीधर देशमुख,
श्री.रघुनाथ गेणू जाधव, श्री.गेणू भिकाजी गोडे,
श्री.संदिप रघुनाथ लेंभे, श्री.बाळासाहेब लक्ष्मण लेंभे,
श्री.भागा गंगाराम शेळके, श्री.चंदन गणपत वायळ,
श्री.भिमराव आबाजी साळवे, श्री.बाळासाहेब संपत बेळे,
सौ.उषा नामदेव गोडे, सौ.सुनंदा नामदेव बांबळे, श्री.चंदु नाना पवार,
स्वि.संचालक :श्री.बाळासाहेब काशिनाथ देशमुख,
श्री.भाऊसाहेब किसनराव पोखरकर,
तज्ज्ञ संचालक: श्री.अमोल तान्हाजी देशमुख, श्री.राजेंद्र सखाहरी देशमुख

### विवि.कार्य.सेवा सोसायटी मर्या; मन्याळे

ता.अकोले, जि.अहमदनगर
चेअरमन: श्री.विश्वास नाथा हांडे
व्हा.चेअरमन: श्री.सोमनाथ लक्ष्मणराव शेळके
सचिव: श्री.मिनानाथ मधुकर दिघे
सन्मा.संचालक मंडळ व सभासद वृंद
कर्मचारी वृंद

### आदिवासी सेवा सोसायटी मर्या; आंभोळ

ता.अकोले, जि.अहमदनगर

चेअरमन :श्री.हौशिराम वाळीबा भोजने

व्हा.चेअरमन : श्री.शांताराम कारभारी चौधरी

सचिव : श्री.गणपत गोडे

सन्मा.संचालक मंडळ व सभासद वृंद
सर्व कर्मचारी वृंद

### कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर
मार्गदर्शक: आ.डॉ.किरण लहामटे
सभापती: श्री.भानुदास तिकांडे
उपसभापती: श्री.रोहिदास भोर
सन्मा.संचालक मंडळ
श्री.शिवनाथ विठ्ठल आरज, श्री.योगेश गजानन आरोटे,
श्री.रुपजी धोंडीबा कचरे, श्री.भास्कर बाळाजी खांडगे,
श्री.सचिन हौशिराम रंधे, श्री.ईश्वर सोमनाथ वाकचौरे,
श्रीम.स्वाती तुकाराम कोरडे, श्रीम.मंगल अनिल भांगरे,
श्री.बाळासाहेब गणपत सावंत, श्री.चक्रधर भिमाजी सदगीर,
श्री.रामकृष्ण अण्णासाहेब, श्री.भाऊसाहेब पांडुरंग नाईकवाडी,
श्री.तुकाराम सोमा खाडे, श्री.अब्दुल ईनामदार,
श्री.किरण हरिभाऊ कानकाटे, श्री.मारुती परशुराम वैद्य,
श्री.अमोल नागनाथ वाघमारे
श्री.अरुण विठ्ठल आभाळे (सचिव)

### सावरगाव पाट विविध कार्य. सेवा सोसायटी लि; सावरगाव पाट

ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन : श्री. विठ्ठलराव माधव पथवे
व्हा.चेअरमन : श्री.पंडीत नेहे
सचिव : श्री.प्रमोद नेहे

– सन्मा.संचालक मंडळ –
श्री.पोपट बाबुराव पवार, श्री.भाऊसाहेब कुंडलिक सहाणे,
श्री.सुधाकर कोंडाजी जगताप, श्री.पांडु शिवराम पथवे,
श्री.लक्ष्मण रामभाऊ कातोरे, श्री.दत्तात्रय केरु सदगीर,
श्री.हौशिराम लक्ष्मण मेंगाळ, श्री.वामन शिवराम पथवे,
श्री.विठ्ठल शिवराम पथवे, श्रीमती ताईबाई पथवे,
श्रीमती गंगुबाई भागा पथवे
स्वीकृत संचालक : श्री.अरविंद केरु जगताप,
श्री.जालिंदर मुरलीधर सहाणे,
तज्ज्ञ संचालक : बाळासाहेब वाळीबा गावंडे,
श्री.विजय कचरु तांबे, कर्मचारी : श्री.सचिन अरविंद भालेराव,
लिपीक : श्री.सोमनाथ पवार, सेल्समन : भाऊसाहेब मेंगाळ

### विविध कार्य.सेवा सोसायटी लि.केळी रुम्हणवाडी

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. सुनिल ज्ञानदेव चौधरी
व्हा. चेअरमन - श्री. मारुती किसन बराते
सचिव - श्री. संदिप रामहरी आरोटे
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### तिरडे आदि. विविध कार्य. सेवा सोसायटी लि. तिरडे

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. शांताराम म्हसु गोडे
व्हा. चेअरमन - श्री. भगवंता लहु खोकले
सचिव - श्री. नवनाथ शंकरराव नेहे पाटील
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### सांगवी आदि. विविध कार्य. सेवा सोसा. लि. सांगवी

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. ढवळा नवसा साबळे
व्हा. चेअरमन - श्री. पोपट दत्तु गभाले
सचिव - श्री. नवनाथ शंकरराव नेहे पाटील
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### आदिवासी विविध कार्य. सेवा सोसा. लि.केळी रुम्हणवाडी

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. परशुराम कचरु डामसे
व्हा. चेअरमन - श्री. माधव राणु बिन्नर
सचिव - श्री. राजाराम कारभारी सहाणे
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### लाडगांव विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. लाडगांव

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### पिंपरकणे विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. पिंपरकणे

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### देवगांव विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. देवगांव

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### ब्राह्मणवाडा विविध कार्य. सेवा सोसायटी लि; ब्राह्मणवाडा

ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन : श्री.पोपट भाऊसाहेब हांडे

व्हा.चेअरमन : श्री.गंगाराम गाजरे

सचिव : श्री.अशोक बबन हांडे

सन्मा.संचालक मंडळ
सन्मा.सभासद व कर्मचारी वृंद

### एकदरे आदि. विविध कार्य. सेवा सोसायटी लि. एकदरे

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. पांडु देवराम भांगरे
व्हा. चेअरमन - श्री. यशवंता ढवळा चंदगिर
सचिव - श्री. शिवाजी लहानु नेहे
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### टाहाकारी आदि. विविध कार्य. सेवा सोसा. लि. टाहाकारी

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन - श्री. दगडु लक्ष्मण बांबळे
व्हा. चेअरमन - श्री. दशरथ कोंडाजी एखंडे
सचिव - श्री. शिवाजी लहानु सहाणे
सर्व सन्मा. संचालक मंडळ व सभासद, कर्म.वृंद..

### शिरपुंजे विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. शिरपुंजे

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### वांजुळशेत विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. वांजुळशेत

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### कातळापुर विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि.कातळापुर

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

### विठे विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. विठे

ता. अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
सर्व सन्मा. संचालक मंडळ

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# २५ फेब्रुवारीला शेगाव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा

**शेगाव : (समर्थ गांवकरी)**



भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने येत्या 25 ते 28 फेब्रुवारी दरम्यान शेगांव येथे "राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा २०२६" चे आयोजन करण्यात आले आहे. या आरोगय मेळाव्याचे उद्घाटन भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते होणार आहे .अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली.

केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की आयुष विभागाच्या वतीने हा आरोग्य मेळावा संत गजानन महाराजांच्या नगरीमध्ये होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल श्री.आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री.एकनाथराव शिंदे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.मकरंदआबा पाटील, सह पालकमंत्री श्री.संजय सावकारे, राज्याचे कामगारमंत्री श्री.आकाश फुंडकर, आ.डॉ.संजय कुटे, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष पद्मश्री पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा तसेच आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य प्रोफेसर राकेश शर्मा यांना देखील निमंत्रित करण्यात आले आहे. आयुष मंत्रालयाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी अखिल भारतीय आयुर्वेद महासंम्मेलनाला देण्यात आली आहे. अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ही महाराष्ट्र त्र्यंबकेश्वर येथे १९०७ साली स्थापन झालेली आयुर्वेदाची सर्वात मोठी व जुनी संघटना आहे जी संपूर्ण देशभर कार्यरत आहे. सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आयोजन समिती स्थापन करण्यात आली असून आयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता यांना आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे. आयुर्वेद महासंम्मेलनाने यापूर्वी २२ राज्यस्तरीय आरोग्य तसेच ३ राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य मेळावे त्यांनी यशस्वीपणे आयोजित केले आहेत.

या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये आयुष चिकित्सा पद्धतींचा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार व योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टीकोनातुन केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 25 ते 28 फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्यात चारही दिवस नागरिकांची व रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देखील विविध तज्ञ व्याख्यानांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या मेळाव्याचा फायदा बुलढाणा जिल्हा व परिसरातील शेतकऱ्यांना देखील होणार असून या मेळाव्यात वन औषधी लागवड, संदर्भात मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे. त्याचा उपयोग शेतकऱ्यांना आपल्या शेतात वन औषधी लागवडीसाठी होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

या आरोग्य मेळाव्यात देशभरातील अनेक आयुष औषध निर्माता कंपनी सहभागी होणार असून त्यांच्या माध्यमातून गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसचा अवलंब ते कशा पद्धतीने करीत आहेत, सोबतच आयुर्वेदामध्ये चाललेले नवीन नवीन संशोधन याबद्दलची माहिती देखील दिली जाणार आहे. आयुष औषधी निर्माता वर्गासाठी देखील वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या ठिकाणी वनऔषधी प्रदर्शनाच्या माध्यमातून सामान्य लोकांना आपल्या जवळपास सापडणाऱ्या वन औषधीच्या साहाय्याने सोपा आणि माफक दरात उपचार कशा पद्धतीने केले जाऊ शकतता याची देखील माहिती या ठिकाणी मेळाव्यात दिली जाणार आहे.

आपण आयुष मंत्री म्हणुन कार्यभार स्वीकारल्यानंतर अभिनव पद्धतीने आयुष मंत्रालयाचे कामकाज पुढे नेण्याचा सातत्याने काम करत आहोत. यातील प्रमुख बाबी म्हणजे, देश का प्रकृति परीक्षण अभियान, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केली. या अभियानात १.३९ कोटी लोकांनी सहभाग घेतला आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये ५ गिनीज विश्वविक्रम नोंदवले गेले.

त्याचप्रमाणे जागतिक आरोग्य संघटनेसोबत (WHO) मिळून पारंपारिक औषधोपचारांवरील दुसरी जागतिक शिखर परिषद डिसेंबर २०२५ मध्ये दिल्लीत संपन्न झाली. यामध्ये १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते,

२५ हून अधिक देशांचे मंत्रीस्तरीय शिष्टमंडळ आले होते आणि १८ देशांसोबत द्विपक्षीय बैठका (Bilateral Meetings) पार पडल्या. जून २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ५ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवले गेले. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे 3 लाखांहून अधिक लोकांनी एकत्र योगाभ्यास केला.



**ठाणे : दिव्यातील आर एल पी शाळेतील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शिवसेना तिसाई शाखेजवळील हॉलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला. प्रसंगी निरोप देताना शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत सर्व शिक्षक व गुरुजन वर्गाचे आभार मानले तर शाळेचे विश्वस्त राजेश पांडे सर, प्रमोद सर, संतोष सर, मनोज सर तसेच मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीक्षा व पुढील वाटचालीस विध्यार्थ्यांना अनेक शुभेच्छा दिल्या. ( फोटो - संतोष पडवळ )**

## जलसंपदा मंत्र्यांची मैदानात फटकेबाजी

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

प्रशासकीय कामाच्या व्यापातून वेळ काढत अधिकाऱ्यांनी मैदानात गाजवलेले कसब व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुद्द मंत्र्यांनीच हातात घेतलेली बॅट... अशा अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात शासनाच्या जलसंपदा विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना लोणी बुद्रुक येथे शानदार सुरुवात झाली. विशेष म्हणजे जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन व जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून खेळात सहभाग नोंदवत खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.

## प्रा. डी एस लहाने लिखित "माझे बाबा माझी प्रेरणा".. पुस्तकाचे थाटात प्रकाशन

■ वाचकाला प्रत्ययानुभूती येणे हा साहित्य निर्मितीचा गुणधर्म असतो : प्रा. सदानंद देशमुख

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**

पुस्तक वाचत असताना वाचकाला उत्कट अनुभूती आली पाहिजे. वाचकाला प्रत्ययानुभूती येणे हा साहित्य निर्मितीचा महत्त्वाचा गुणधर्म असल्याचे बारोमासकार प्रा. सदानंद देशमुख म्हणाले. प्रा. डी एस लहाने लिखित माझे बाबा ..माझी प्रेरणा पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रा. डी एस लहाने यांनी वडिलांकडून मिळालेली वैचारिक शिदोरी माझे बाबा माझी प्रेरणा या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ 5 फेब्रुवारी रोजी शिवसाई



कॉम्प्लेक्स, जुना अजिसपूर रोड येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर वसंतराव चिंचोले होते. तर ग्रामीण कवी तुळशीराम मापारी, डॉ. कि वा वाघ, प्रा. डी एम कानडजे ,पि डी सपकाळ, सौ दिपाली पाटील, साहित्यिक वैशाली तायडे, पत्रकार राजेंद्र काळे, पत्रकार गणेश निकम ,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, प्राचार्य शाहिनाताई पठाण, पत्रकार सुरेखा सावळे, प्रतिभा भुतेकर, अनिता कापरे, प्रा. रवींद्र साळवे, प्रा. पारवे ,प्रा. ज्योती पाटील ,सौ मीनाताई लहाने ,एडवोकेट संदीप जाधव, किरण पाटील, दिनकर पांडे आदींची उपस्थिती लाभली.

प्रास्ताविक डी एस लहाने यांनी केले. बाबांच् आचरण हाच आपल्यासाठी महत्त्वाचा संदेश होता असे ते म्हणाले. साधे सरळ जीवन जगण्याची शिकवण बाबानी दिली. त्यांनी दिलेले विचारधन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पुस्तकाचे लेखक प्रा. डी एस लहाने यांनी सांगून पुस्तक निर्मितीची प्रक्रिया उलगडली. तर होत्याचं नव्हतं झाल्यावरही जो डगमगत नाही तो "बाप" अशा शब्दात ग्रामीण कवि तुळशीराम मापारी यांनी भावना व्यक्त केल्या. प्रा. डी एस लहाणे यांनी वडिलांच्या आठवणी पुस्तक रूपाने मांडल्यात,हे पुस्तक पुढच्या पिढीला प्रेरणा देणारे ठरेल असे साहित्यिक वैशाली तायडे म्हणाल्या.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वसंतराव चिंचोले, नरेश शेळके, कि वा वाघ ,शेळके गुरुजी ,पि डी सपकाळ, प्रा. कानडजे यांनी विचार व्यक्त केले. प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक लेखन सहाय्य केल्याबद्दल सौ दिपाली पाटील इंगळे यांचा कौटुंबिक विशेष सत्कार करण्यात आला. संचलन रवींद्र साळवे तर आभार प्रदर्शन पत्रकार गणेश निकम यांनी मानले. शिवसाई परिवार व मानस फाउंडेशनने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत 'सप्तरंग महोत्सव २०२६' साजरा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत अधिकारी-कर्मचारी यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. दि. ०६ फेब्रुवारी, २०२६ रोजी 'सप्तरंग महोत्सव २०२६' सांस्कृतिक कार्यक्रम गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे संपन्न झाला. कार्यक्रमांचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रणजित यादव याच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी GPF ॲप अनावरण करण्यात आले. कलेला वाव मिळण्यासाठी जिल्हा परिषद आयोजित 'सप्तरंग महोत्सव २०२६' कार्यक्रम अधिकारी-कर्मचारी यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हा मंच महत्वाचा असून सर्वांनी आनंदाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले. कलेच्या माध्यमातून अधिकारी कर्मचाऱ्यांमधील धुरंधर कलाकारांचे दर्शन यानिमित्ताने होईल. कार्यक्रमासाठी सामान्य प्रशासन विभागाने पुढाकार घेऊन उत्तम कामगिरी केल्याबद्दल उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे व सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन करून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी माध्यमिक देविदास महाजन, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास विभाग संजय बागुल, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग पद्माकर लहाने, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, प्रकल्प संचालक जलजीवन मिशन पंडीत राठोड, उप अभियंता (यांत्रिकी) संजय सुकटे, समाजकल्याण अधिकारी उज्वला सकपाळे, गट विकास अधिकारी (मग्रारोहयो) प्राची साळसकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर, जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी, विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दररोजच्या कामातून अधिकारी व कर्मचारी यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## कुमशेत येथे ६५.२८ टक्के मतदान

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुमशेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे सकाळी साडेसात ते साडेपाच वाजेपर्यंत ६९ ४मतदान एकूण ६५. २८% शांततेत पार पडले. गावामध्ये तरुण , ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनींनी ग्रामस्थांनी शांततेत मतदान प्रक्रिया पूर्ण केली. याप्रसंगी ओतूर - धालेवाडी जिल्हा परिषद उमेदवार छाया अतुल तांबे व अक्षदा प्रसाद पानसरे तसेच धालेवाडी तर्फे हवेली पंचायत समिती उमेदवार उल्का बबन मोरे व डॉ.सुनिता दौलत नायकोडी यांनी भेट दिली. निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रय दाते , दत्तात्रय जोशी , अर्चना जोरे , स्मिता चव्हाण , पोलीस पाटील मंगेश डोके , पोलीस कॉन्स्टेबल संभाजी गोपाळ , उपशिक्षक शाम लालपोड , कर्मचारी संदेश डोके , आरोग्य कर्मचारी वैशाली मोरे , म गां तं अध्यक्ष मंगेश भगत उपस्थित होते.

## सार्वजनिक वृक्ष लागवडीत रोहयो विभागाचा भोंगळ कारभार

### काम न करता परस्पर बिले उचलले, एपीओ , रोजगार सेवकाची ठेकेदारी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील मौ, बोळेगाव, थडी सावळी, हरणाळी, बिजूर, सगरोळी, येसगी,रामतीर्थ, कामरसपल्लीसह अनेक गावात रोहयो विभागाचे संबंधित साह्यक कार्यक्रम अधिकारी, ग्रामरोजगार सेवक व तांत्रिक सह्यक यांच्या संगणमताने सदरील गावात अनेक कामासह वृक्षारोपण, संगोपन न करता कामात मोठ्या प्रमाणात ठेकेदारी पद्धत अवलंबून परस्पर कोट्यावधी रुपये हडप केले आहे. या भोंगळ कारभाराची सखोल चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

बिलोली पंचायत समिती रोहयो विभागात कार्यरत असलेले साह्यक कार्यक्रम अधिकारी साहेबराव सोंडारे हे स्थानिकचे असून गेल्या सात वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने बिलोलीच्या रोहयो विभागात मोठ्या प्रमाणात भोंगळ कारभार चालू आहे. तालुक्यात सोंडारे हे रुजू झाल्यापासून ते आजतागायत रोहयो अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कामात मोठ्या प्रमाणात ठेकेदारी पद्धत चालू आहे. सोंडारे यांनी संबंधित गावातील ग्रामरोजगार सेवक व तांत्रिक साह्यक यांना हाताशी धरून तालुक्यातील बोळेगाव, सगरोळी, येसगी, थडी सावळी, बिजूर, आदमपूर, रामतीर्थ, कमरसपल्ली, हरणाळी,चिटमोगरा डोणगांवसह अनेक गावात विविध कामासह सार्वजनिक वृक्षारोपण व संगोपणाच्या नावाखाली सरळ ठेकेदारी पद्धत अवलंबून कोट्यावधी रुपयाचा गैरव्यवहार करून शासनाचा निधी हाडप केला आहे. या बाबत अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत.

मागील २०११ - १२ मध्ये मुखेड तालुक्यातील मौ. मंडलापूर या गावात रोहयो योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे प्रकरण महाराष्ट्रात गाजले होते. आता त्याची पुनरावृत्ती बिलोली तालुक्यातील मौ. बोळेगांव मध्ये होताना दिसत आहे. येथील ग्रामरोजगार सेवक रोहयोच्या विविध कामासह पाच ठिकाणी करण्यात येत असलेल्या सार्वजनिक वृक्षारोपण व संगोपणात मोठा गैरव्यवहार करून काम न करता परस्पर लाखो रुपये हडप केले. यामुळे त्यास ग्रामपंचायत स्थरावर ग्रामसभेत ठराव घेऊन निलंबीतही करण्यात आले होते.

## दिवा शिळफाटा येथे पाण्याच्या डबक्यात मुलीचा मृतदेह आढळला



**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

आज सकाळी ८ : ४५ वाजताच्या सुमारास खान कंपाउंड, शिळफाटा, दिवा, ठाणे या ठिकाणी खान कंपाउंड मागे कु. कशफ नबीला फेहजान अहमद खान(स्त्री/ ०६ वर्षे ) राहणार: रूम नंबर ६०२, आशना हाईट्स, शीळफाटा) या मुलीचा मृतदेह पाण्याच्या डबक्यात आढळून आला होता. सदर घटनास्थळी शिळ अग्निशमन केंद्राचे स्थानक अधिकारी श्री. सरनोबत सो. डायघर पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान १ इमर्जन्सी वाहनासह उपस्थित होते. सदर ठिकाणी अग्निशमन दलाच्या जवानांकडून सदर मृतदेह बाहेर काढण्यात आला असून डायघर पोलिसांच्या उपस्थितीमध्ये शववाहिकेतून पुढील कार्यवाहीकरिता छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा, ठाणे येथे पाठविण्यात आला आहे.

## लिंगदेव येथे ग्राम स्वच्छता अभियान संपन्न

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे सद्या चालू असलेल्या मुख्यमंत्री ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत गावातील साफसफाई व गाव स्वच्छ ठेवण्याचे काम महाराष्ट्रभर चालू आहे. याच उद्देशाने लिंगदेव येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. गावातील रस्ते व रस्त्याच्या बाजूला असणारी स्वच्छता करण्यात आली .यावेळी लिंगेश्वर आदर्श विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक यांचे मोलाचे योगदान लाभले. अकोले तालुक्याचेआमदार डॉ. किरणजी लहामटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली लिंगदेव ग्रामपंचायतच्या सदस्य कल्पना हरिभाऊ फापाळे यांनी या ग्राम स्वच्छता अभियानाचे नेतृत्व केले. सकाळी आठ वाजता लिंगदेव येथे लिंगेश्वर आदर्श विद्यालय परिसर व खटपट नाका लिंगेश्वर मंदिर परिसर तसेच मराठी शाळेकडे येणारा परिसर रस्ता स्वच्छ केला गेला . खरंतर लिंगदेव गाव गेल्या पाच वर्षात बदलण्याचे काम आमदार किरणजी लहामटे साहेबांनी केले. त्याचाच काहीसा प्रत्यय म्हणून आज गावात चालू असलेले विकास कामे ही चांगल्या स्थितीत करून घेणे व गावाला एक वेगळीच दिशा देण्याचे काम आमदार डॉ.किरणजी लहामटे साहेबांच्या माध्यमातून लिंगदेव ग्रामपंचायत सदस्या सौ.कल्पना हरिभाऊ फापाळे यांनी केले. गावातील येणारे सर्व रोड हे अगदी चांगल्या स्थितीत करून घेण्याचे भाग्य आम्हांला लाभले त्यामुळे गावाचा कायापालट करण्यात आम्ही यशस्वी ठरलो.

गावात सुसज्ज तलाठी कार्यालय ,ग्रामपंचायत कार्यालय, धुपे रोड ,चास रोड त्याचप्रमाणे फापाळेवाडी रोड हा आमदार साहेबांच्या योगदानातूनच झालेला आहे. गावात अजून सुसज्ज असे वाचनालय ही येत्या काही दिवसात उभे राहणार आहे. खरंतर याचे सर्व श्रेय मी आमदार डॉ. किरणजी लहामटे साहेब यांना देते कारण माझ्यासारख्या एक सर्वसाधारण कुटुंबातील ग्रामपंचायत सदस्यावर व गावातील ग्रामस्थांवर विश्वास ठेवून एवढा भरघोस निधी देण्याचे काम आमदार साहेबांनी केले. म्हणून मी आमदार साहेबांचे मनःपूर्वक आभार मानत व असाच गावात पुढील विकास चालू ठेवण्यासाठी आम्ही तत्पर राहू असेही यावेळी त्यांनी सांगितले .तरुणांना हाताला रोजगार निर्मिती करण्याचे काम आमदार साहेबांच्या माध्यमातून होणार आहे. लिंगदेव गावातील 40 एकर जमीन ही एमआयडीसी क्षेत्र म्हणून घोषित झालेले आहे. लवकरच तेही मार्गी लागेल व अकोले तालुक्यातील तरूणांच्या हाताला रोजगार मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करते व आमदार साहेबांनी जे काही विकास कार्य केले त्या कार्याचा मी मनस्वी आभार व्यक्त करते. असे लिंगदेव ग्रामपंचायत सदस्या सौ. कल्पना हरिभाऊ फापाळे यांनी मानले.

यावेळी ज्ञानगंगा वाचनालय लिंगदेव अध्यक्ष सदाशिव कानवडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ज्येष्ठ नेते भाऊसाहेब हाडवळे, लिंगेदव ग्रामपंचायत सरपंच अमित घोमल, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र पावसे, कर्मचारी दत्तु फापाळे,नवनाथ सूर्यवंशी , संदीप गोडे , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे,लिंगेश्वर आदर्श विद्यालय माजी मुख्याध्यापक गोपीनाथ हाडवळे सर, विद्यमान मुख्याध्यापक राधाकिसन घुले सर, एकनाथ भाईक सर, अविनाश शेटे , रेवगडे रामकृष्ण, राधकिसन लांडगेसर एन डी कडलग , तागडंकर अरुण, वाळुंज ए व्हि , प्रमिला नेहे, साहेबराव खेमनर,शिपाई बाळासाहेब कोरडे, चौधरी राजू व शिक्षक वृंद यांचे मोलाचे योगदान लाभले.

# वाचन, अवलोकन आणि मेहनत करून वक्तृत्व घडविता येते

## श्रीरामशेठ पन्हाळे : अॅड. देशमुख महाविद्यालयात राज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा संपन्न

राजूर : (समर्थ गांवकरी)



राजूर येथील अॅड.एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कै. होनाजी तुकाराम कोंडार स्मृतीचषक राज्यस्तरीय वादविवाद व कै. डॉ. माधवराव दिगंबर उमराणी स्मृतीचषक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेचे पारितोषिक वितरण सत्यनिकेतन संस्थेचे संचालक श्रीराम पन्हाळे व सामाजिक कार्यकर्ते प्रेमानंद पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीरामशेठ पन्हाळे यांनी वाचन, अवलोकन आणि मेहनत करून वक्तृत्व घडविता येते तर सखोल अभ्यासातून वादविवादात यश संपादन करता येते असे प्रतिपादन केले. राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचा कै. होनाजी तुकाराम कोंडार सांघिक फिरता स्मृतीचषक संगमनेरच्या श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयाच्या इरफान शेख व आकाश बोडखे या संघाने जिंकला, तर कै. डॉ. माधवराव दिगंबर उमराणी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक स्मृतिचषक अकोले येथील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या प्राची कोकणे व ऋतुजा बगनर या संघाने जिंकला. वादविवाद स्पर्धेचे वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक (रू.३००१) इरफान शेख, श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय संगमनेर; द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (रू.२५०१) मयुरी कानवडे, अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले; तृतीय क्रमांकाचे पारितोषिक (रु.२००१) आकाश बोडखे, श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय संगमनेर तर उत्तेजनार्थ पारितोषिके (प्रत्येकी रु. ७०१) दर्शन चौधरी व करिष्मा मधे, अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले या स्पर्धकांनी जिंकली. वक्तृत्व स्पर्धेचे वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक (रू.३००१) प्राची कोकणे, अगस्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोले; द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (रू.२५०१) आकाश बोडखे, श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय संगमनेर; तृतीय क्रमांकाचे पारितोषिक (रू.२००१) ऋतुजा बगनर, अगस्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोले तर उत्तेजनार्थ पारितोषिके (प्रत्येकी रू.७०१) दिव्या थेटे, संगमनेर महाविद्यालय संगमनेर, मयुरी धोंगडे, अॅड.एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर या स्पर्धकांनी जिंकली. महाविद्यालयाचे प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. यावेळी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. सुनील शिंदे, प्रा. विनोद येलमामे यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रा. भाऊसाहेब देशमुख यांनी भूषविले. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. रावसाहेब ननावरे, आभार प्रदर्शन वादविवाद व वक्तृत्व मंडळ कार्याध्यक्ष डॉ. पंढरीनाथ करंडे आणि सूत्रसंचालन प्रा. गणेश कुसमुडे यांनी केले. स्पर्धांच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# महाराजा कॉलेजच्या शेंडे, भदे व होले यांचे युनिफाईट व हाफकिडो बॉक्सिंग शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत यश

- प्रणव शेंडेची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)



शालेय राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धा दि. ४ व ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई-पनवेल येथे पार पडली. या स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय व प्रेक्षणीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या यशात भर घातली. या स्पर्धेत प्रणव शेंडे याने ६२ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. तसेच श्रीनाथ भदे याने ५४ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवला. याशिवाय दि. २ व ३ जानेवारी २०२६ रोजी महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय हाफकिडो बॉक्सिंग स्पर्धेत प्रथमेश होले याने ७० किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी आमदार बबनराव पाचपुते, समिती सदस्य मा. बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार राहुल जगताप, मा. महावीर पटवा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, पर्यवेक्षक रत्नकर झिटे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, क्रीडा समितीचे चेअरमन प्रा. श्रीकांत थोरात, विभागप्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, कार्यालय प्रमुख राऊत सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना कोच चंद्रकांत राहिज, क्रीडा शिक्षक संजय डफळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# एका कलाकाराकडून दुसऱ्या कलाकाराचा सन्मान



पालघर : (समर्थ गांवकरी)

मोज़ॅक कलेत १९ जागतिक विक्रम प्रस्थापित करणारे सुप्रसिद्ध कलाकार चेतन राऊत यांनी पद्मश्री पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ आदिवासी कलाकार भिकल्या धिंडा यांचा सायकल भेट देत सन्मान केला. एका कलाकाराने दुसऱ्या कलाकाराचा केलेला हा सन्मान कलाक्षेत्रातील परंपरा, संवेदनशीलता आणि परस्पर आदराचे प्रतीक ठरला आहे.

आदिवासी लोककलेला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यात भिकल्या धिंडा यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून चेतन राऊत यांनी हा अभिनव उपक्रम राबवला. कला ही केवळ प्रदर्शनापुरती मर्यादित नसून ती समाजाशी जोडलेली असावी. साधेपणा, सातत्य आणि सामाजिक बांधिलकी हीच कलाकाराची खरी ओळख असल्याचे मत यावेळी चेतन राऊत यांनी व्यक्त केले. याप्रसंगी भिकल्या धिंडा यांनीही सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, नव्या पिढीतील कलाकारांनी परंपरेचा सन्मान राखत नवोन्मेष साधावा, असा प्रेरणादायी संदेश दिला. या कार्यक्रमाला स्थानिक कलाकार, कलाप्रेमी आणि यावेळी मोज़ॅक कलेत १९ जागतिक विक्रम प्रस्थापित करणारे सुप्रसिद्ध कलाकार चेतन राऊत तसेच वारली चित्रकार निलेश राऊत आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कलाक्षेत्रातील पिढ्यांमधील संवाद, प्रेरणा आणि आपुलकी जपणारा हा क्षण उपस्थितांच्या मनात विशेष ठसा उमटवून गेला.

# जलसंपदा मंत्र्यांची मैदानात फटकेबाजी

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

प्रशासकीय कामाच्या व्यापातून वेळ काढत अधिकाऱ्यांनी मैदानात गाजवलेले कसब व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुद्द मंत्र्यांनीच हातात घेतलेली बॅट... अशा अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात शासनाच्या जलसंपदा विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना लोणी बुद्रुक येथे शानदार सुरुवात झाली. विशेष म्हणजे जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन व जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून खेळात सहभाग नोंदवत खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.

# नाशिकच्या कार्तिक कुमारने खुल्या गटात मिळवले विजेतेपद

पारनेर : (समर्थ गांवकरी)



नागेश्वर मित्र मंडळाच्या वतीने २५ वर्षांपासून यशस्वीपणे आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धेच्या रौप्य महोत्सवी आवृत्तीत तब्बल ७४३ स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. या स्पर्धेत नाशिकचा कार्तिक कुमार याने खुल्या गटात (पुरुष) प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले.

नागेश्वर मित्र मंडळाने "देशभक्ती हेच रूप समाजभक्ती" हे ब्रीद घेऊन ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. यंदाच्या स्पर्धेला राज्यभरातून मोठ्या संख्येने धावपटूंनी हजेरी लावली होती. शुक्रवार रात्रीपासूनच स्पर्धक पारनेरमध्ये दाखल झाले होते. सकाळी ६.३० वाजता पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते झेंडावंदन करून खुल्या गटाची स्पर्धा सुरू झाली. यावेळी पारनेरमधील शिक्षक, प्राध्यापकांसह अनेक स्थानिक नागरिकांनीही सहभाग घेतला.

शालेय स्तरावरील विविध गटांमध्ये पारनेर तालुक्यातील आणि परिसरातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. पहिली ते चौथी इयत्तेतील मुलांमध्ये शिवंम शिंगटे (ढवळपुरी) प्रथम, तर मुलींमध्ये जया ठोंबरे (ढवळपुरी) प्रथम ठरल्या. पाचवी ते सातवी गटात महेश शिंगटे (ढवळपुरी) आणि प्रांजल जाधव (अळकुटी) यांनी अनुक्रमे मुला-मुली गटात विजय मिळवला. आठवी ते दहावी गटात शुभम पांढरे (न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर) आणि समृद्धी जाधव (अळकुटी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

खुल्या गटात (पुरुष) कार्तिक कुमार (नाशिक) प्रथम, कृष्णा गायखे (नगर) द्वितीय, साहील ठुबे (कडुस) तृतीय, सार्थक आजबे (नगर) चौथा आणि अजीत पांढरे (पारनेर) पाचवा राहिला. विशेष वैशिष्ट्ये आणि प्रायोजक या ग्रामीण भागातील राज्यस्तरीय स्पर्धेत सर्व सहभागींना टी-शर्ट देणारी ही पहिलीच मॅरेथॉन ठरली. सुपा येथील पुष्पा स्टील कंपनीने हे टी-शर्ट उपलब्ध करून दिले. स्पर्धेसाठी अरीहंत ज्वेलर्स, कन्हैया अॅग्रो, मातोश्री बिल्डकान, प्रताप अंबुले, पारनेर नगरपंचायत, सीए कौस्तुभ काकडे, पंचायत समिती पारनेर आदींनी सहप्रायोजक म्हणून पाठबळ दिले. उद्घाटन यशराज उद्योग समूहाचे सुनील थोरात, सुनील पवार, दत्तात्रय अंबुले आदींच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण डॉ. विद्या बाळासाहेब कावरे (नगराध्यक्ष), योगेश मते (सभापती), पोलिस निरीक्षक संतोष खेडकर, मारूती शेठ रेपाळे आदींच्या हस्ते पार पडले. पारनेर पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता, तर इंदिरा गांधी नर्सिंग कॉलेजच्या परिचारिकांनी आरोग्य पथक म्हणून सेवा दिल्या.

या स्पर्धेने ग्रामीण भागातील धावपटूंना प्रोत्साहन मिळाले असून, स्थानिक स्तरावर खेळाला चालना मिळाली आहे.

# 'शेतकरी जगला पाहिजे या भूमिकेवर ठाम

- ओंकार शुगर ग्रुपची कृतीतून सिद्ध झालेली बांधिलकी
- ५० लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण; १,२७० कोटी रुपयांची ऊस बिले अदा

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)



ओंकार शुगर ग्रुपने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. या हंगामात ग्रुपच्या सर्व साखर कारखान्यांमार्फत एकूण ५० लाख मेट्रिक टन ऊस गाळप यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले असून, याचा थेट लाभ परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना झाला आहे.

या गाळपासाठी शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या ऊसापोटी ओंकार शुगर ग्रुपने १,२७० कोटी रुपयांची ऊस बिले सर्व युनिट्समार्फत वेळेत व पूर्णतः अदा केली आहेत. सर्वोच्च ऊस दर, काट्यावर अचूक वजन आणि वेळेवर बिल अदा करणे ही ओंकार शुगर ग्रुपची ओळख असून, ही परंपरा यंदाच्या हंगामातही कृतीतून अधोरेखित झाली आहे.

ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांनी यापूर्वीच स्पष्टपणे मांडलेली भूमिका – "शेतकरी जगला पाहिजे; शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे" – ही केवळ शब्दांपुरती मर्यादित न राहता यंदाच्या गळीत हंगामात प्रत्यक्षात उतरलेली दिसून आली. कुठेही वजन केले तरी काटा अचूक राहील, सर्वोच्च ऊस दर दिला जाईल आणि ऊस बिल वेळेत मिळेल, ही ठाम भूमिका ओंकार ग्रुपने प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केली आहे.

ग्रुपच्या विविध युनिट्समध्ये आधुनिक यंत्रसामग्री, पारदर्शक प्रशासन आणि नियोजनबद्ध गाळप प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपाला गेला. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले नाही तसेच त्यांचे उत्पन्न सुरक्षित राहिले. 'शेतकऱ्यांचा ऊस ही आमची जबाबदारी' या भावनेतून ओंकार शुगर ग्रुपने संपूर्ण हंगामात कामकाज केले.

या माध्यमातून केवळ साखर उत्पादनात वाढच नव्हे तर शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास आणि स्थानिक पातळीवरील रोजगारनिर्मिती साधली जात आहे. भविष्यातही 'शेतकरी केंद्रबिंदू' ही भूमिका कायम ठेवत ओंकार शुगर ग्रुप शेतकरी हित, ग्रामीण विकास आणि विश्वासार्ह उद्योगसमूह म्हणून आपली वाटचाल सातत्याने पुढे नेत राहील, असा ठाम विश्वास शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे

# सुद्दढ शरीरातूनच उत्तम प्रशासन घडेल

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

खेळ आपल्याला जीवनाचे महत्त्वाचे धडे देतो. खेळामुळे आपण पराभव पचवायला व विजयात नम्रता बाळगायला शिकतो. खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते. मनातील अहंकार गळून पडतो. आपल्या प्रशासकीय कामकाजात व वैयक्तिक आयुष्यातही या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे केवळ स्पर्धेपुरते न खेळता, व्यायामाचा हा मंत्र आयुष्यभर जपा. यातूनच चांगले आरोग्य, सकारात्मक मानसिकता व पर्यायाने एक उत्तम प्रशासन घडेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन यांनी केले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या वतीने लोणी - शिर्डी (ता. राहाता) येथे आयोजित जलसंपदा विभागाच्या 'पाचव्या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-२०२६' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

# इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींचे दणदणीत यश

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)



दि. ६ फेब्रुवारी रोजी संजिवनी पॉलिटेक्निक, कोपरगाव येथे आय.ई.डी.एस.एस.ए.ई. झोन-१ अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो-खो व कबड्डी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत खो-खो व कबड्डी या दोन्ही क्रीडाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. अंतिम फेरीत गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, अहिल्यानगर या बलाढ्य संघाला पराभूत करत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या संघांनी आपले वर्चस्व सिद्ध केले. संघभावना, अचूक रणनीती व दमदार खेळाच्या जोरावर विद्यार्थीनींनी प्रेक्षकांची मने जिंकली. कबड्डी संघातील खेळाडू इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग :

ढवळे अनुजा, कारंडे सुप्रिया (कर्णधार), गिरमकर पूर्वी, हिरडे स्नेहल, कातोरे प्रतीक्षा

कॉम्प्युटर विभाग :

थोरात श्रेया, केकन सुहानी, सांगळे कल्याणी, दळवी अनुराधा, मदने वैष्णवी

सिव्हिल विभाग :

थोरात सृष्टी

खो-खो संघातील खेळाडू

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग :

मांडगे अनुजा (कर्णधार)

कॉम्प्युटर विभाग : जगताप ऐश्वर्या, सरोदे सृष्टी, पवार दीक्षा, जगताप कोमल, इथापे तनुजा, महारनूर कुसूम, सकट उषा, चोरमले तनुश्री, पंधरकर दीप्ती, सांगळे कल्याणी, शेवाळे वैष्णवी

या उल्लेखनीय यशामुळे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या खो-खो व कबड्डी संघांची दि. १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेंद्र (दादा) नागवडे, व्हॉ. चेअरमन सौ. मेघाताई औटी, सर्व सन्माननीय संचालक मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड (सर), प्राचार्य प्रशांत भोईटे (सर), क्रीडा शिक्षक मिलिंद शेलार (सर) व झेंडे मॅडम, तसेच विभागप्रमुख हवालदार (सर), नातू (सर), इथापे (सर), शिंदे (सर) व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीला राज्यात प्रथम क्रमांक

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील इयत्ता अकरावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु. मायेशा फैय्याज शेख हिने के. बी. रोहमारे स्मृती करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. ही वक्तृत्व स्पर्धा यंदा अकराव्या वर्षी आयोजित करण्यात आली होती. के. जे. सोमय्या वरिष्ठ व के. बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालय, कोपरगाव येथे ही राज्यस्तरीय स्पर्धा उत्साहात पार पडली. कनिष्ठ महाविद्यालयीन गटात कु. मायेशा शेख हिने "अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकाराचे अग्रदूत कै. के. जी. रोहमारे (दादा)" या विषयावर प्रभावी वक्तृत्व सादर करत प्रथम क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल तिला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पाच हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. तिला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शंकर गवते यांचे मार्गदर्शन लाभले. कु. मायेशा ही महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री. फैय्याज शेख यांची कन्या असून, तिने यापूर्वीही अनेक वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

# मढेवडगाव येथे कृषीकन्या व कृषीदूतामार्फत कृषी मेळावा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा तालुका (समर्थ गांवकरी)



श्री दत्तकृपा शैक्षणिक कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव येथील कृषीकन्या व कृषीदूतांच्या संयुक्त विद्यमाने मढेवडगाव येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास तालुक्यातील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. के. एच. निंबाळकर होते. उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे यांच्या हस्ते करण्यात आले, तर सचिव अर्चना दत्तात्रय पानसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत कृषीकन्या अनिशा रुपनवर, स्नेहल आचार्य, पूनम गायकवाड, प्रणाली मादनकर, प्रणोती महारनवर तसेच कृषीदूत कुणाल काळभोर, यशराज काळाणे, प्रतीक जठार, मनमोहन देवीकर, वैभव कोकरे व अभिजीत क्षीरसागर यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

यावेळी प्रा. डॉ. के. एच. निंबाळकर यांनी पिकांचे बाजारभाव, आधुनिक शेती पद्धती तसेच नियोजनबद्ध शेतीचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. गावपातळीवर शेतकरी समित्या स्थापन करून त्यानुसार पिकांचे नियोजन, मशागत व कीड नियंत्रण केल्यास रोगप्रादुर्भाव टाळता येऊन उत्पादनात वाढ होईल, असे त्यांनी सांगितले. भारत हा कृषिप्रधान देश असून अन्नधान्य उत्पादन व वितरणात देशाचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी इतरांच्या अनुभवावर अवलंबून न राहता कृषी विभागातील तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच खते व कीटकनाशकांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. यासाठी गावात कार्यरत कृषीकन्या, कृषीदूत तसेच शासकीय कृषी सहाय्यक अधिकाऱ्यांची मदत घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण म्हणून सिजेंटा, बायस्टेट, बी.ए.एस.एफ., बायर, कोरोमंडल आदी नामांकित शेती औषध कंपन्यांचे माहितीपूर्ण स्टॉल लावण्यात आले होते.

कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, मंडळ कृषी अधिकारी शीतल आरू, कृषी सहाय्यक अधिकारी किरण घोडके, संचालक सुभाष शिंदे, सरपंच प्रमोद शिंदे, उक्कडगावचे सरपंच प्रसाद महाडिक, स्मितल वाबळे, चेअरमन सुमन मांडे, उक्कडगावचे चेअरमन पंडित कातोरे, बाळासाहेब मांडे, संतोष गुंड, उपसरपंच राजकुमार उंडे, राहुल साळवे, व्हा. चेअरमन शरद शिंदे, युवा उद्योजक सचिन कातोरे, व्हा. चेअरमन संदीप औटी, जैविक शेती मित्र संतोष पानसरे, माजी सरपंच फुलसिंग मांडे यांच्यासह कार्यक्रम समन्वयक प्रा. शैलजा औटी, प्रा. नागेश जाधव, प्रा. सुप्रिया बंडगर आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीमद् भागवत सप्ताहाचा भक्तिमय शुभारंभ!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

पशु कल्याणासारख्या पवित्र आणि मानवतेच्या कार्यासाठी आझादनगर, ब्रह्मांड, ठाणे येथील सीपीएसी पशुवैद्यकीय रुग्णालयात आयोजित श्रीमद् भागवत सप्ताहाचा भक्तिमय शुभारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. परम दयाळू भगवान श्रीकृष्णाच्या असीम कृपेने सुरू झालेला हा सप्ताह दि. ६ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. हा श्रीमद् भागवत सप्ताह केवळ आध्यात्मिक उन्नतीपुरता मर्यादित न राहता, मूक प्राण्यांच्या आरोग्य, संरक्षण व कल्याणासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शास्त्रानुसार मुक्या जीवांची सेवा करणे म्हणजेच देवाची प्रत्यक्ष सेवा होय. शब्दांविना वेदना सहन करणाऱ्या प्राण्यांची काळजी घेणे ही मानवतेची सर्वोच्च अभिव्यक्ती असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला म्हणाले, “आजच्या स्वार्थी युगात प्राण्यांच्या कल्याणासाठी श्रीमद् भागवत कथेच्या माध्यमातून जनजागृती करणारा हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून समाजाला करुणा व सहअस्तित्वाचा संदेश देणारा आहे.”

त्यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी कथाकार पूज्य जिग्नेशभाई जयेशभाई जोशी महाराज, दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे,

श्री दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर (मालाड), श्री फिरोजभाई पटेल (मालाड), नगरसेवक श्री लहू पाटील, श्री निमेशभाई शहा, श्री पांडुरंग पाटील, सौ. शकुंतला मजुमदार, डॉ. सुहास राणे,

श्री देबासीस मजुमदार, सौ. ममता गिरथ, श्री मुकेश गिरी, श्री राजेश तलरेजा,

सौ. प्राची मोटा, श्रीमती मीरा सुरेश ठक्कर, श्री कृष्णा श्री नामदार राही,

श्री कांतीलाल बोराडे, श्री राजेंद्र पुराणी, श्री राजेंद्र पांडे,

सौ. अमिताभ परेश ठक्कर, श्रीमती किम जितेंद्र ठक्कर यांच्यासह कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या सप्ताहात ओजस्वी वक्ते व श्रेष्ठ कथावाचक पूज्य श्री जिग्नेश महाराज जोशीजी श्रीमद् भागवत कथेच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक आनंदाचा अनुभव देत आहेत. त्यांच्या मुखातून साकार होणारी कथा केवळ शब्दांची माळ नसून, ती नीतिमत्ता, समर्पण आणि ईश्वरभक्ती जागृत करणारी आत्मस्पर्शी अनुभूती ठरत आहे.

# मोदी सरकारला एकही घोटाळा सिद्ध करता आला नाही

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



काँग्रेस काळात झालेल्या आंतरराष्ट्रीय करारांची माहिती पत्रकार परिषदांमधून पारदर्शकपणे दिली जात होती, मात्र मागील १२ वर्षांत मोदी सरकारला एकही करार किंवा घोटाळा सिद्ध करता आलेला नाही, असा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला आहे. तिवारी म्हणाले की, युपीए सरकारच्या काळात तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी युरोपियन देशांशी तसेच युरोपियन युनियनसोबत विविध करार करून त्याबाबत खुल्या पत्रकार परिषदांमधून माहिती दिली. १९९४ च्या भारत–EU सहकार्य करारानंतर २००४ मध्ये धोरणात्मक भागीदारी सुरू झाली, २००५ मध्ये संयुक्त कृती योजना तयार झाली आणि २००८ मध्ये ती अद्ययावत करण्यात आली. या करारांमुळे राजकीय, आर्थिक आणि सुरक्षा सहकार्य मजबूत झाल्याचे त्यांनी नमूद केले. युपीए सरकारच्या काळात भारताने फ्रान्स, जर्मनी आणि यूकेसारख्या देशांशी द्विपक्षीय संबंध वाढवले. या काळात भारताने जागतिक स्तरावर स्वतंत्र भूमिका राखत आर्थिक महासत्ता म्हणून उदय घेतल्याचा दावा त्यांनी केला.

तिवारी यांनी आरोप केला की, २०१४ पूर्वीच्या काळात २जी, कोळसा घोटाळा आदींचे आरोप करून भाजपने सत्ता मिळवली; मात्र सत्तेत आल्यानंतर या प्रकरणांपैकी एकही घोटाळा सिद्ध करण्यात सरकारला यश आले नाही. तसेच रोजगार, शेतकरी उत्पन्न वाढ, काळा पैसा परत आणणे यांसारख्या आश्वासनांची पूर्तता झाली नसल्याचेही त्यांनी म्हटले.

आंतरराष्ट्रीय धोरणांबाबतही त्यांनी सरकारवर टीका करत अमेरिकेसोबतच्या व्यापार व संरक्षण विषयांमध्ये भारताने दबावाखाली निर्णय घेतल्याचा आरोप केला. नोटबंदी, पुलवामा हल्ला, मणिपूर घटना, चीन सीमावाद आदी मुद्द्यांवर संसदेत सखोल चर्चा होऊ दिली नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसविरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदी करत असलेल्या टीकेला उत्तर देताना तिवारी यांनी उपरोधिक भाषेत प्रतिक्रिया देत ती हतबलतेतून केली जात असल्याचे म्हटले.

# कुरुंद प्राथमिक शाळेत संविधानाचा अवमान?

- मुख्याध्यापकांवर कारवाईची मागणी
- आरपीआयकडून आंदोलनाचा इशारा



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मौजे कुरुंद (गावठाण), तालुका पारनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात संविधानाच्या प्रतिमेचे तसेच कोणत्याही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन न करण्यात आल्याचा आरोप करत स्थानिक रहिवासी राजेंद्र मधुकर उबाळे यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, मुख्याध्यापकांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.उबाळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, "प्रजासत्ताक दिन हा संविधानावर आधारित आहे. या संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकाला समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्व ही मूल्ये दिली आहेत. समाजातील तळागाळातील शेवटच्या माणसालाही संधी उपलब्ध करून देणारे हे संविधान देशाला एकसंघ ठेवण्यासाठी निर्माण झाले. मात्र, शाळेतील मुख्याध्यापकांनी या संविधानाचा अवमान केल्याने आमच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत." ते पुढे म्हणाले की, योग्य कारवाई न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय) राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले (गट) यांच्याकडून आंदोलन उभारण्यात येईल. या तक्रारीची दखल घेत गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने चौकशी सुरू केल्याची प्राथमिक माहिती आहे. शाळा प्रशासनाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया मिळालेली नाही.

# रामदास किसन थोरात यांचा मृत्यू

**(समर्थ गांवकरी)**



रामदास किसन थोरात गावातून घरी परत येत असताना एच.पी. पेट्रोल पंपासमोर अज्ञात वाहनानी धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला होता त्या संदर्भात पारनेर पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. नं. ००७६ दि. ०३/०२/२०२६ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली. परंतु हा अपघाताचा प्रकार एच.पी. पेट्रोल पंप सी.सी.टी.व्ही. असल्याने त्यामधून फुटेज काही नातेवाईकांनी हस्तगत करण्यात आले आहे. त्यानुसार फुटेज तपासणी करुन त्यावेळेस गेलेल्या वहानाची तपासणी करुन त्यांचेवर गुन्हा नोंदवून तात्काळ आरोपी अटक करण्यात यावी व रामदास थोरात यांचा घातपाताचा संशय असुन त्याची सखोल तपासणी करण्याच यावी.

# वनकुटे ग्रामपंचायतीत दलित वस्ती सुधार योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार

## १६ फेब्रुवारीला ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

वनकुटे( ता.पारनेर) ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक (दलित वस्ती) सुधार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या निधीत मोठा अपहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या बाबतचे लेखी निवेदन गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसुळे यांच्याकडे ग्रामस्थ संतोष केदारी यांनी दिले आहेत. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई न झाल्यास येत्या १६ फेब्रुवारी २०२६ पासून पंचायत समितीसमोर उपोषणाला बसण्याचा इशारा ६३ नागरिकांनी लेखी पत्राद्वारे दिला आहे.ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीनुसार, एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत भीम नगर वस्तीच्या नावाखाली बँक स्टेटमेंटवरून लाखो रुपये काढण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात वस्तीमध्ये कोणतीही कामे झालेली नाहीत. केवळ कागदावर बोगस बिले आणि एम.बी. (मोजमाप पुस्तिका) तयार करून हा निधी हडप करण्यात आल्याचा आरोप होत आहे.

१५ व्या वित्त आयोगातून भीम नगरमध्ये एलईडी लाईट बसवण्यासाठी २ लाख ५७ हजार २५८ रुपये खर्च झाल्याचे ऑनलाइन दाखवण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात वस्तीत एकही नवीन दिवा बसवलेला नाही. या संदर्भात बँक स्टेटमेंट आणि ऑनलाइन बिलांचे पुरावे गट विकास अधिकारी पारनेर यांना सादर करण्यात आले आहेत.



येत्या १४ फेब्रुवारीपर्यंत या प्रकरणाची चौकशी होऊन संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास १६ फेब्रुवारी रोजी सामूहिक उपोषण करण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला आहे. या तक्रारीमुळे पारनेर तालुक्यात खळबळ माजली असून प्रशासकीय भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर संतोष बबन केदारी, दिपक भाऊसाहेब खामकर, संदेश दगडू केदारी, पोपट रघुनाथ खैरे, साजन बबन साळवे, सुदाम दामू केदारी सह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.

# सीग्राम रॉयल स्टॅग बूमबॉक्स ‘जनरेशन लार्ज’च्या मूळ आवाजासह दमदार पुनरागमन

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**




सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा बॉलीवूडच्या अजरामर सुरांना आणि हिप-हॉपच्या ऊर्जावान तालांना एकत्र आणणारा, संगीतप्रेमींमध्ये खास ओळख असलेला अनुभवाधारित संगीत महोत्सव पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित सीझन फोरसह परतला आहे. मागील सर्व सीझनना मिळालेल्या प्रचंड यशावर उभारलेला हा नवा सीजन यंदा अधिक भव्य आणि महत्त्वाकांक्षी ठरणार असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कलाकारांची दमदार फळी यात सहभागी होणार आहे. तरुणाईच्या उत्साहाने भरलेल्या व्हिझाग, कोलकाता, मुंबई आणि मोहाली या चार प्रमुख शहरांमध्ये होणारा हा मल्टी-सिटी टूर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे.

रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आजच्या तरुण पिढीच्या विविध आवडी-निवडींना एकत्र आणणारा, आगळा-वेगळा अनुभव देणारा उपक्रम म्हणून ओळखला जातो. संगीत, फॅशन, खाद्यसंस्कृती आणि गेमिंग अशा तरुणाईच्या आवडत्या क्षेत्रांना जोडणाऱ्या उपसंस्कृतिक घटकांचा सुरेख संगम साधत, हा मंच प्रेक्षकांना वेगळ्या आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनुभव देतो. सीझन 4 ची सुरुवात 21 फेब्रुवारी 2026 रोजी कोलकात्यातून होणार असून, त्यानंतर हा संगीतसोहळा 7 मार्चला विशाखापट्टणम, 21 मार्चला मुंबई आणि 28 मार्चला मोहाली येथे रंगणार आहे. स्थापनेपासूनच या महोत्सवाने बॉलीवूडमधील दिग्गज आवाज आणि ऊर्जावान हिप-हॉप कलाकारांच्या थरारक जुगलबंदीमधून भारताच्या लाईव्ह म्युझिक विश्वाला नवे रूप दिले आहे. यंदाच्या सीझनमध्ये जागतिक ख्यातीचा डीजे ऍलान वॉकर, रॅप सुपरस्टार बादशाह, चार्टबस्टर कलाकार अरमान मलिक आणि डिव्हाईन, तसेच सुमधुर गायिका नीति मोहन, निकिता गांधी, रश्मीत कौर, श्रीराम चंद्रा आणि दिग्गज बँड फॉसिल यांचा दमदार आणि तगडा लाइन-अप प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या संगीत उत्सवाची रंगत आणखी वाढवण्यासाठी हिप-हॉपमधील दिग्गज रफ्तार आणि डिनो जेम्स, तसेच लोकप्रिय डीजे साहिल गुलाटी ही मंचावर धमाल सादरीकरण घेऊन येणार आहेत, चार्टबस्टर गाण्यांची मेजवानी आणि थरारक परफॉर्मन्सचा अविस्मरणीय प्रवास प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. इतक्यावरच थांबत नाही. गेमिंग विश्वातील प्रसिद्ध स्टार पायल धरे हिच्यासोबत होणारा थरारक गेमिंग फेस-ऑफही चाहत्यांना पाहायला मिळणार असून, त्यामुळे हा सीझन खऱ्या अर्थाने एक संपूर्ण, सहभागात्मक आणि भव्य सांस्कृतिक महोत्सव ठरणार आहे.

# नीरज पांडे यांचे अधिकृत निवेदन

**------ : (समर्थ गांवकरी)**

आमचा चित्रपट हा पूर्णपणे काल्पनिक पोलिस ड्रामा आहे. यात “पंडत” हा शब्द फक्त एका काल्पनिक पात्रासाठी वापरले गेले आहे. ही कथा एका व्यक्तीच्या कृती आणि निर्णयांवर आधारित आहे. याचा कोणत्याही जाती, धर्म किंवा समुदायाशी संबंध नाही, तसेच कोणावरही टीका करण्याचा उद्देश नाही. एक चित्रपट दिग्दर्शक म्हणून मी माझ्या कामाकडे मोठ्या जबाबदारीने पाहतो आणि नेहमी विचारपूर्वक आणि आदराने कथा मांडतो. हा चित्रपटही माझ्या आधीच्या चित्रपटांप्रमाणेच प्रामाणिक हेतूने आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठीच तयार केला गेला आहे. चित्रपटाच्या शीर्षकामुळे काही प्रेक्षकांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, याची आम्हाला जाणीव आहे आणि आम्ही त्यांच्या भावनांचा मनापासून आदर करतो.

# आमदारांच्या एका फोनने प्रलंबित पाणीप्रश्न सुटला

- कुपनलिकेची नवीन मोटर कार्यान्वित

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील गोरगरीब रुग्णांसाठी आधारवड असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयाचा गेल्या काही दिवसांपासून रेंगाळलेला पाण्याचा प्रश्न आमदार काशीनाथ दाते (सर) यांच्या पुढाकारामुळे अखेर मार्गी लागला आहे. रुग्णालयातील कूपनलिकेची (बोअरवेल) मोटर नादुरुस्त झाल्याने निर्माण झालेली पाणीटंचाई आता दूर झाली असून, नवीन मोटर बसवल्याने रुग्ण आणि प्रशासनाने सुटकेचा निश्वास टाकला आहे. पारनेर ग्रामीण रुग्णालय हे तालुक्यातील आरोग्यसेवेचे मुख्य केंद्र आहे. मात्र, अचानक कूपनलिकेची मोटर नादुरुस्त झाल्याने रुग्णालयाचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. रुग्णालयातील स्वच्छता, शस्त्रक्रिया गृह आणि रुग्णांच्या दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्याअभावी प्रशासनाची मोठी ओढाताण होत होती. रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती.

सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी या गंभीर समस्येबाबत आमदार काशीनाथ दाते सर यांना फोन करून परिस्थितीची कल्पना दिली होती.रुग्णांचे हाल होत असल्याचे समजताच आमदारांनी तात्काळ रुग्णालय प्रशासनाला या प्रश्नावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यांच्या सूचनेनंतर प्रशासनाने तातडीने हालचाली करत नवीन मोटर बसवून पाणीपुरवठा पूर्ववत केला आहे.

मोटर दुरुस्त होईपर्यंतच्या काळात रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आमदार काशीनाथ दाते, सावित्री-फातिमा सद्भावना मंचचे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद आणि पाणीपुरवठा सभापती योगेश मते यांनी स्वखर्चाने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. या सामाजिक बांधिलकीमुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळाला होता. आमदारांच्या या तत्परतेबद्दल आणि संवेदनशीलतेबद्दल पारनेर तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे. या कार्यामुळे रुग्णालयाचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटण्यास मदत झाली आहे.

# प्रा. विजयकुमार म्हस्के यांना बँकिंग अँड फायनान्स विषयात पीएच. डी. पदवी प्रदान

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**



येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्रा. विजयकुमार म्हस्के यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी बँकिंग अँड फायनान्स विषयात डॉ. प्रशांत साळवे यांच्या मार्गदर्शनखाली "अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज वितरण धोरणांचा शेतीपूरक व्यवसायांवर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. या संशोधनाचा उपयोग ग्रामीण भागातील दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, प्रक्रिया उद्योग व स्वयंरोजगार यांना मिळणाऱ्या वित्तपुरवठ्याची परिणामकारकता स्पष्ट होईल. योग्य कर्जधोरणांमुळे उत्पादन, उत्पन्न व रोजगार वाढीस कसा हातभार लागतो हे या अभ्यासातून दिसून येईल.

तसेच अडचणी व मर्यादा ओळखून अधिक व्यवहार्य व शेतकरीहित विषयी धोरणे सुचवता येतील. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीपूरक उद्योजकांना शाश्वत आर्थिक बळकटी मिळण्यास हा अभ्यास उपयोगी ठरेल. प्रा. विजयकुमार म्हस्के हे मागील ८ वर्षापासून बाबुजी आव्हाड महाविद्यालयात वाणिज्य विभागात कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड , प्राचार्य डॉ. बबन चौरे, मार्गदर्शक डॉ. प्रशांत साळवे, व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# पाणी व्यवस्थापनातून गाव बदलाच्या उंबरठ्यावर

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



सह्याद्रीच्या हिरव्यागार रांगांच्या कुशीत वसलेले पिंपळगाव घाडगा—निसर्गसंपन्न, जैवविविधतेने नटलेले हे गाव पावसाळ्यात पाण्याने ओसंडून वाहते. पण उन्हाळा आला की कोरड्या जमिनी, आटलेल्या विहिरी आणि पाण्यासाठीची धडपड हेच वास्तव होते. पाणी होते, पण ते थांबत नव्हते; जमीन होती, पण ती तृषार्त होती. भातशेतीवर अवलंबून असलेल्या या गावात पावसाळ्यानंतर शेती जवळजवळ ठप्प व्हायची. दुबार पीक स्वप्नच राहायचे. घरातील कर्ते पुरुष मुंबई-नाशिककडे रोजगारासाठी स्थलांतर करायचे, तर महिला आणि वृद्ध गावात थांबायचे—एकाकी, चिंतेत आणि अनिश्चिततेत. पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या नव्हती; ती सामाजिक आणि आर्थिक संकटही बनली होती.

या वास्तवातूनच गरजाधारित, समुदाय-केंद्रित आणि हवामान-अनुकूल उपक्रमाची आवश्यकता निर्माण झाली. याच पार्श्वभूमीवर पिंपळगाव घाडगा या गावात बायफ संस्थेच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली आणि महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या CSR निधीतून ‘पाणी व्यवस्थापन (जलसमृद्धी) प्रकल्प’ राबविण्यात येत आहे. गावपातळीवरील सर्वेक्षण, समूहचर्चा, पाणी-संसाधन नकाशीकरण, भौगोलिक संरचनेचा अभ्यास आणि या सर्वातून गावाच्या गरजांवर आधारित प्रकल्पाचा आराखडा तयार झाला.

प्रकल्पाची उद्दिष्टे बहुआयामी आहेत. पाणीसाठा उपलब्ध करणे आणि सुधारित शेती व सिंचन पद्धतींद्वारे शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रकल्प क्षेत्रात पाणी संवर्धन व भूजल पुनर्भरणाद्वारे जलस्रोत विकसित करणे, आवश्यक सुविधा उभारून पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे आणि जलसाठ्याच्या सुरक्षित, दर्जेदार संरचना निर्माण करणे यावर भर देण्यात आला आहे. लोकांचा सक्रिय सहभाग हा या प्रकल्पाचा गाभा ठेवण्यात आला आहे. केवळ पाणी साठवणे नव्हे, तर पाणी व्यवस्थापन करणे; दुबार पिकांतून चांगले उत्पन्न घेणे; स्थलांतर कमी करणे; महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे; आणि हवामान बदलाच्या धोक्यांना तोंड देणारी शाश्वत व्यवस्था उभारणे हा प्रकल्पाचा व्यापक उद्देश आहे. प्रकल्प तीन परस्परपूरक स्तंभांवर उभा आहे. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतकऱ्यांची क्षमता बांधणी व संघटन आणि हवामान बदल अनुकूलन. या तिन्ही घटकांचा समन्वय साधून पाणी, माती, शेती आणि उपजीविका यांचा एकात्मिक परिवर्तनाचा मार्ग आखण्यात आला आहे.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत क्षेत्रीय उपचार (WAT, FB) हा महत्त्वाचा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामुळे पावसाचे पाणी अडवले जाऊन जमिनीत मुरेल, मातीची धूप थांबेल आणि भूजल पुनर्भरणाला चालना मिळेल. यातून विहिरींची आणि जवळपासच्या जलस्रोतांची पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे. या क्षेत्रीय उपचारांमुळे अप्रत्यक्षरित्या उत्पन्न तर वाढणार आहेच, तसेच स्थानिक परिसंस्थाही स्थिर होतील.

दुसरा निर्णायक उपक्रम म्हणजे शेततळी. एकूण १६ शेततळी पूर्ण झाली आहेत. शेततळ्यांत HDPE लाइनिंग शीटचे अस्तरीकरण करण्यात आले आहे. या शेततळ्यांमुळे गावातील जलसुरक्षा मजबूत होणार आहे आणि संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. शेततळ्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाणीसाठ्यातून नगदी पिके, फुलशेती व भाजीपाला पिके घेता येणार आहेत. एकूणच शेतीत आमूलाग्र बदल घडून येणार आहे, या आशेने प्रकल्पात सहभागी शेतकऱ्यांत उत्साहाचे वातावरण आहे.

क्षमता बांधणी व समुदाय संघटन हा प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे.

# सुदृढ शरीरातूनच उत्तम प्रशासन घडेल - जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

- लोणी - शिर्डी येथे जलसंपदा विभागाच्या पाचव्या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना प्रारंभ
- ७ ते ९ फेब्रुवारी तीन दिवस स्पर्धा रंगणार



शिर्डी : (समर्थ गांवकरी)

खेळ आपल्याला जीवनाचे महत्त्वाचे धडे देतो. खेळामुळे आपण पराभव पचवायला व विजयात नम्रता बाळगायला शिकतो. खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते. मनातील अहंकार गळून पडतो. आपल्या प्रशासकीय कामकाजात व वैयक्तिक आयुष्यातही या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे केवळ स्पर्धेपुरते न खेळता, व्यायामाचा हा मंत्र आयुष्यभर जपा. यातूनच चांगले आरोग्य, सकारात्मक मानसिकता व पर्यायाने एक उत्तम प्रशासन घडेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन यांनी केले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या वतीने लोणी - शिर्डी (ता. राहाता) येथे आयोजित जलसंपदा विभागाच्या 'पाचव्या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-२०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जलसंपदा मंत्री श्री. महाजन म्हणाले, मी स्वतः शालेय जीवनापासून खेळाशी जोडलेलो आहे. एक खेळाडू म्हणून मला खेळाचे महत्त्व जवळून माहित आहे. तुम्ही या स्पर्धेकडे नियमित व्यायाम व सराव म्हणून पाहिले पाहिजे. जीवनात शारीरिक तंदुरुस्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्यायाम ही आपली रोजची गरज बनली पाहिजे. जेव्हा आपली शरीरयष्टी चांगली असते, तेव्हा मनही सुदृढ राहते. सुदृढ मनामुळे कामात एकाग्रता वाढते, चिडचिड होत नाही व कामाचा अतिरिक्त ताण जाणवत नाही.

आजच्या धावपळीच्या युगात कामाचे ओझे निश्चितच जास्त आहे, पण त्यावर मात करण्यासाठी व्यायामाला पर्याय नाही. त्यामुळे दिवसातून किमान अर्धा-पाऊण तास तरी स्वतःसाठी वेळ काढा. धावणे, चालणे किंवा योगासने करा. अनेकदा तणाव आला म्हणून लोक व्यसनाचा आधार घेतात, परंतु तणाव कमी करण्यासाठी व्यसनाची मुळीच गरज नसते. जर तुमची तब्येत चांगली असेल, तर मनस्थिती आपोआपच चांगली राहते. तुमच्या मनगटात ताकद असेल, तर मनात आपोआप धाडस निर्माण होते. हे केवळ नियमित व्यायाम व सुदृढ शरीरामुळेच साध्य होऊ शकते, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले. पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, सहकाराचा वारसा लाभलेली ही भूमी आता क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करत आहे. ज्याप्रमाणे सहकारातून विकासाची दिशा मिळते, तसेच खेळाच्या माध्यमातून प्रशासनात शिस्त व सांघिक भावना रुजविण्याचे आमचे ध्येय आहे. अहिल्यानगरच्या मातीत सेवाभाव व खेळाडूवृत्तीचा अनोखा संगम साधला गेला असून, स्पर्धेतील जय-पराजयापेक्षा येथून मिळणारी सकारात्मक ऊर्जा व प्रशासकीय मैत्रीबंध अधिक घट्ट करणे, हाच या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. अपर मुख्य सचिव श्री. कपूर म्हणाले, स्पर्धेत केवळ सहभाग महत्त्वाचा नसून जिंकण्याच्या जिद्दीनेच खेळा. क्रीडांगणात उतरल्यावर विजय मिळवण्याच्या उद्देशानेच खेळले पाहिजे.

## डॉ. प्रितेश पाटील यांच्या एम.बी.बी.एस. यशाबद्दल दैनिक समर्थ गांवकरी समूहातर्फे सत्कार!



भिवंडी (ठाणे) : (समर्थ गांवकरी)

दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील समाजसेवक, दानशूर व्यक्तिमत्त्व व धर्मसेवक समाज कल्याण न्यास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धर्मसेवक सोन्या पाटील यांचे चिरंजीव डॉ. प्रितेश पाटील यांनी एम.बी.बी.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सन्मानचिन्ह, मानपत्र, खोबरे-खारीक हार घालून हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर तसेच जे. के. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. प्रितेश पाटील यांच्या शैक्षणिक यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डिस्ने क्रूझ लाइनकडून अभिनेता शाहरूख खान यांच्यासह लायन किंग संकल्पनेवर आधारित फायरवर्क्स शोची घोषणा




पुणे: (समर्थ गांवकरी)

डिस्ने क्रूझ लाईनने डिस्ने अॅडव्हेंचरवरील रात्रीचे आकाश एका नवीन, खास "द लायन किंग: सेलिब्रेशन इन द स्काय" या संकल्पनेवरील आतषबाजीत रूपांतरित होईल. समुद्रात देखण्या आतषबाजीचे प्रदर्शन सादर करणारी जगातील एकमेव क्रूझ लाईन ठरणारी डिस्ने क्रूझ लाईन चाहत्यांसाठी वेगळे काहीतरी घेऊन येणार असून ख्यातनाम अभिनेता शाहरुख खान या नवीन शोचा निवेदक असणार आहे. जगातील सर्वात प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे आणि प्रेक्षकांच्या मनात खास स्थान असलेले शाहरूख खान डिस्ने अॅडव्हेंचरमध्ये आपला करिष्मा, लोकप्रिय आवाज आणि कथाकथनाच्या शैलीद्वारे सर्व वयोगटातील पाहुण्यांना हृदयस्पर्शी प्रवासात घेऊन जाईल. डिस्नेच्या द लायन किंग (२०१९) आणि मुफासा (२०२४) यांच्या हिंदी भाषेतील आवृत्तीत मुफासाला आवाज देणारा खान आता या सुंदर अनुभवात आपली खास शैली आणि आकर्षकता आणेल. तसेच तो पाहुण्यांना एका ताज्या आणि धाडसी नवीन पद्धतीने या सुंदर कथेशी जोडेल. डिस्नेच्या सर्वात प्रिय चित्रपटांपैकी एकावर आधारित "द लायन किंग: सेलिब्रेशन इन द स्काय" रात्रीच्या आकाशात एक नवीन प्रयोग घेऊन येत आहे. त्यातून डिस्नेच्या द लायन किंग आणि त्याच्या आनंददायी जीवनाची एक देखणी सफर घडवली जाईल. हा शो कुटुंबं आणि मित्रांना जहाजावर जमण्यासाठी आमंत्रित करेल, जेणेकरून ते नेत्रदीपक आतषबाजी, नाट्यमय प्रकाशयोजना आणि मनोवेधक संगीताचा आनंद घेऊ शकतील.

## आंबेगावमध्ये क्रॉस व्होटिंगची चर्चा

मंचर: (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील पाच जिल्हा परिषद गट आणि दहा पंचायत समिती गणांमध्ये मतदान पार पडल्यानंतर आता क्रॉस व्होटिंगची चर्चा रंगू लागली आहे.त्यामुळे काही उमेदवारांचे विजयी गणित बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मतदानाच्या दिवशी काही ठिकाणी पक्षनिष्ठेपेक्षा वैयक्तिक समीकरणांना प्राधान्य देत मतदारांनी वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांना मते दिल्याची चर्चा मतदारसंघात जोर धरत आहे.सामान्यतः एका पक्षाचा जिल्हा परिषद उमेदवार आणि त्याच पक्षाचा पंचायत समिती उमेदवार यांनाच मतदान होणे अपेक्षित असताना काही ठिकाणी भिन्न पक्षातील उमेदवारांना मतदान झाल्याचे बोलले जात आहे.

## संतोष सुरवसे यांना हिंदी विद्यापीठकडून डॉक्टरेट पदवी प्रदान

जामखेड : (समर्थ गांवकरी)

जामखेड तालुक्यातील छोट्याशा खेडेगावातील धामणगाव येथील शेतकरी पुत्र संतोष धोंडिबा सुरवसे यांच्या शिरपेचात सरोच्च मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्ली येथील प्रसिद्ध रेडिसन ब्लू हॉटेल येथे पडलेल्या दिमाखदार समारंभात हा सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. देशातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते संतोष धोंडिबा सुरवसे यांना हा गौरव करुन पदवी प्रदान करण्यात आली.




यावेळी उपस्थित मान्यवरामध्ये पद्मश्री डॉ अरविंद कुमारजी (कुलगुरू राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी महाविद्यालय) जामखेड डॉ. इंदू भूषण मिश्राजी (कुलगुरू पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ मथुरा उ प्रदेश) डॉ. ऋतू दुबै तिवारीजी (ज्येष्ठ साहित्यिक गाजियाबाद) डॉ. शिवाजी रामभाऊ शिंदे (सदस्य रेल मंत्रालय भारत सरकार) तसेच डॉ. विश्वनाथ पाणिगृहजी (राष्ट्रीय पर्यावरण वर्ल्ड रेकॉर्ड धारक छत्तीसगड) या सर्व मान्यवरांच्या हस्ते संतोष धोंडिबा सुरवसे यांना कृषी विकास व देशी गो संवर्धन या कार्याबद्दल मनपूर्क कौतुक करत समाजाला योग्य दिशा व मार्गदर्शन देण्याचे कार्य पुढेही अविरत पणे चालू राहील असा विश्वास व्यक्त केला.

संतोष सुरवसे हे केवळ कृषी विकास व देशी गोवंश संवर्धन एवढेच करत नसून पुढेही आपण समाजाचे काही तरी देणे लागतो म्हणून समाजातील वंचित व उपेक्षित घटकांसाठी असे भरीव कार्य करत आहेत. गरजूंना विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप , फराळ वाटप, हिवाळ्यात उबदार ब्लँकेट कपडे वाटप, तसेच विविध प्रकारचे उपक्रम स्वच्छता, दीपावली मध्ये पंचगव्य शाही अभ्यंगस्नान, वृक्षारोपण रक्तदान शिबिर व आरोग्य शिबीर असेल असे त्यांच्या ह्या बहुआयामी कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठ ने घेतली आहे. या सन्मानामुळे राज्यभरातून तसेच विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छा चा वर्षाव होत आहे. कृषी विकास एवं गो संवर्धन क्षेत्रातील या मानाच्या गौरवामुळे महाराष्ट्र राज्य जामखेड तालुक्यातील छोट्याशा खेडेगाव धामणगाव मधील सामान्य कुटुंब तील शेतकरी पुत्राचा सन्मान झाल्याबद्दल मानाचा तुरा शिरपेचात रोवला गेला आहे. यावेळी डॉ संतोष धोंडिबा सुरवसे म्हणाले की हा सन्मान माझा एकट्याचा नसून तो माझ्या वर प्रेम करणारे सामाजिक कार्यात सदैव साथ देऊन पाठीवर थाप देऊन लढ म्हणणारे माझे मार्गदर्शक मित्र सहकारी हितचिंतक परिवार या सर्वांचा हा सन्मान आहे.

## राइडर-नेतृत्वाखालील समुदायांसाठी भारतातील पहिले भव्य राष्ट्रीय पुरस्कार -विंगमॅनएक्स अवॉर्ड्स पुण्यात होणार



पुणे : (समर्थ गांवकरी)

भारताच्या राइडिंग समुदायासाठी एक ऐतिहासिक क्षण ठरणाऱ्या विंगमॅनएक्स अवॉर्ड्स २०२५ -२६ चे उद्घाटन १५ फेब्रुवारी २०२६ रोजी हॉटेल हयात पुणे येथे होणार आहे. भारतातील आघाडीचे कम्युनिटी-टेक व्यासपीठ विंगमॅनएक्स, मोटरसायकलस्वारांसाठी समर्पित या पहिल्या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांचे आयोजन करत आहे. राइडर-नेतृत्वाखालील सन्मानासाठी राष्ट्रीय मापदंड ठरणाऱ्या या पुरस्कारांचा उद्देश भारतीय मोटरसायकलिंगची खरी ओळख ठरवणाऱ्या चिकाटी, शिस्त, जबाबदारी आणि समुदायभावना यांचा गौरव करणे हा आहे. भारतात प्रथमच राइडिंग परिसंस्थेला मुल्यवर्धित करणाऱ्या गुणांसाठी राइडर्स आणि राइडिंग समुदायांचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान केला जाणार आहे. एका राइडरच्या गरजेतून उगम पावलेले आणि वाढत्या समुदायाने घडवलेले विंगमॅनएक्स अवॉर्ड्स, देशभरातील मोटरसायकलिंग संस्कृतीला शांतपणे बळकट करणाऱ्या व्यक्ती आणि क्लब्सचा सन्मान करतात. या पुरस्कारांमध्ये एकूण २० निवडक श्रेणी आहेत, ज्यात वैयक्तिक उत्कृष्टता आणि सामूहिक समुदाय प्रभाव या दोन्हींचा समावेश आहे. सुरक्षित राइडिंगचे नेतृत्व, लांब पल्ल्याचे राइडिंग, महिला राइडर्स आणि समुदाय-नेतृत्वाखालील उत्कृष्टतेचा गौरव करणाऱ्या श्रेणी यात समाविष्ट असतील. यामध्ये गार्डियन राइडर अवॉर्ड, लाँग हॉल लेजेंड्स, शी राईड्स फ्री, क्लब ऑफ द इयर, सेफ्टी-फर्स्ट क्लब अशा श्रेणींचा समावेश आहे. या उपक्रमामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना निलेश साने, सीईओ आणि सह-संस्थापक, विंगमॅनएक्स म्हणाले, "विंगमॅनएक्सची सुरुवात राइडर्सना योग्य राइडिंग साथीदार शोधण्यात मदत करण्याच्या साध्या कल्पनेतून झाली. कालांतराने ते विश्वास, जबाबदारी आणि समुदायभावनेवर उभे असलेले एक व्यापक परिसंस्था बनले. विंगमॅनएक्स अवॉर्ड्स हे अशा राइडर्सचा सन्मान करण्याचे आमचे माध्यम आहे, जे रोज या मूल्यांनुसार जगतात आणि कोणतीही प्रसिद्धीची अपेक्षा ना करता, भारताची मोटरसायकलिंग संस्कृती घडवतात."

## मतमोजणीपूर्वी उमेदवारांचे ताणतणाव वाढले

मंचर: (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर आता मतमोजणीपूर्वी राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.मतदानानंतर विविध गावांमध्ये आणि मळ्यांमध्ये अपेक्षित मतदान झाले नाही, काही कार्यकर्ते विरोधात गेले, तर काही ठिकाणी प्रतिस्पर्धी उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात पैसे वाटप झाल्याच्या चर्चांनी उमेदवारांचे ताणतणाव वाढले आहेत.या चर्चांचा परिणाम निकालावर होणार का, याबाबत सर्वत्र उत्सुकता निर्माण झाली आहे. काही उमेदवारांच्या समर्थकांकडून "आपल्या बाजूने मतदान कमी झाले", "काही कार्यकर्त्यांनी साथ सोडली", "समोरच्या गटाने जोरदार हालचाली केल्या" अशा चर्चा ऐकू येत असून, त्यामुळे निकालाबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडियाकडून महाराष्ट्रातील पुणे येथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)



तरूणांमध्ये रस्त्यावर सुरक्षित राइडिंग सवयींना चालना देण्याप्रती सुरू असलेल्या प्रयत्नांशी बांधील राहत होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया (एचएमएसआय) ने आज पुणे, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत आर्मी पब्लिक स्कूल, देहू रोड येथील 2,430 हून अधिक सहभागींमध्ये जनजागृती करण्यात आली, जेथे रस्त्यावर जबाबदारीने ड्रायव्हिंग वर्तणूक आणि मुलभूत वाहतूकीच्या नियमांबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यात आला.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सुरूवातीच्या टप्प्यामध्ये आवश्यक रस्ता सुरक्षा पद्धतींची ओळख करून देण्यात आली, ज्यामुळे त्यांना रस्त्यावरील वर्तमान व भावी वापरकर्ते म्हणून त्यांची भूमिका समजण्यास मदत झाली. तरूण वयामध्ये जनजागृती सुरक्षित सवयींना आकार देण्यामध्ये आणि रस्त्यावर माहितीपूर्ण निर्णय घेण्यास प्रेरित करण्यामध्ये, तसेच सांगण्यात आलेल्या माहितीच्या माध्यमातून कुटुंब व समुदायाला रस्ता सुरक्षेची जाणीव करून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

सहभागींनी परस्परसंवादात्मक सत्रांमध्ये सहभाग घेतला, ज्यामध्ये सुरक्षित राइडिंगबाबत मार्गदर्शन, धोका ओळखण्याचे प्रशिक्षण, गेम्स आणि क्विझेसचा समावेश होता. रस्ता सुरक्षेबाबत सहजपणे समजण्यास मदत होईल अशाप्रकारे सर्व सत्रे डिझाइन करण्यात आली होती, ज्यामध्ये सहभागींना दैनंदिन प्रवासामध्ये या पद्धतींचा अवलंब करण्यास प्रेरित करण्यात आले.

## प्रा. डॉ. विजय देशमुख यांना नॅशनल मास्टर्स गेम्समध्ये सुवर्णपदक

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)



येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य मास्टर्स गेम्स असोसिएशनच्या वतीने नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या 'युनायटेड नॅशनल मास्टर्स गेम्स' मध्ये वेटलिफ्टिंग आणि पॉवरलिफ्टिंग अशा दोन्ही क्रीडा प्रकारांत दोन सुवर्णपदके पटकावली आहे.

प्रा. डॉ. देशमुख यांनी ५० वर्षांवरील वयोगटात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर वेटलिफ्टिंग स्पर्धेत एकूण १५५ किलो वजन उचलले तर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत एकूण ३६० किलो वजन उचलून सुवर्णपदकावर नाव कोरले. याआधी त्रिवेंद्रम येथील 'नॅशनल मास्टर्स गेम्स' आणि पिंपरी-चिंचवड येथील राज्यस्तरीय स्पर्धेतही त्यांनी सुवर्ण यश संपादन केले होते. नाशिकमधील या विजयामुळे त्यांच्या सुवर्णपदकांची दिमाखदार 'हॅट्ट्रिक' पूर्ण झाली आहे. या दैदीप्यमान यशामुळे त्यांची आगामी वर्ल्ड मास्टर्स गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा १७ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत श्रीराचा, थायलंड येथे संपन्न होणार आहे.

## सोनालिकाने पूर्णपणे नवीन आणि शक्तिशाली 'सोनालिका गोल्ड सिरीज' केली लॉंच

पुणे : (समर्थ गांवकरी)




सोनालिका ट्रॅक्टरने गेल्या ३० वर्षांपासून भारतातील कृषी परिवर्तनाची आधारभूमी म्हणून कार्य केले आहे. सर्व प्रकारच्या माती आणि पिकांच्या विविधतेतील शेतकऱ्यांच्या विकसित होत असलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांना जिंकण्याची ताकद (जीतने का दम) देण्यावर कंपनीने दृढ विश्वास बाळगला आहे. आपल्या ब्रँडवरील शेतकऱ्यांच्या विश्वासाला ३० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून सोनालिका ट्रॅक्टरने पूर्णपणे नवीन आणि शक्तिशाली 'सोनालिका गोल्ड सिरीज' लॉंच केली आहे. ती त्यांच्या "जेव्हा शेतकरी पुढे जातो, तेव्हा देश पुढे जातो" या तत्वज्ञानाचे प्रकटीकरण आहे.

सर्वात मोठ्या इंजिन आणि नवीन सुट्या भागांसह कामगिरीचे बावनकशी सोने सोनालिका गोल्ड मालिका 'खऱ्या सोन्या'चे सर्वार्थाने प्रतिनिधित्व करते. ती काळाबरोबरच वाढणारा विश्वास आणि मूल्य देते आणि प्रत्येक हंगामात ताकद देणाऱ्या तंत्रज्ञानाने बनवलेली आहे. शेतीची अवजारे आकाराने वाढत असताना,शेतकऱ्यांवर कामाचा बोजाही वाढत आहे. त्यामुळे सोनालिकाने शेतकऱ्यांच्या वेगाने वाढणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या नवीन मालिकेतील दोन ट्रॅक्टर – गोल्ड डीआय ७४५ III आणि गोल्ड डीआय ५५ III लॉंच केले आहेत. नवीन गोल्ड डीआय ७४५ III ट्रॅक्टरला या श्रेणीतील नवीन आणि सर्वांत मोठ्या ३ सिलेंडर ई ३.५ इंजिनची शक्ती लाभली आहे. जोरदार कामगिरीसाठी ती २२० एनएम च्या कमाल टॉर्कसह ३५३२ सीसी क्षमता प्रदान करते .

यात एक नवीन १६एफ +४ आर मल्टी-स्पीड ट्रान्समिशनसुद्धा असून ते विविध उपयोगांमध्ये उच्च कार्यक्षमतेसह जड भार चालविण्यासाठी सुरळीत शक्ती मिळण्याची सुनिश्चिती करते. सर्वार्थाने नवीन ग्लोबल पीटीओ आणि हेवी ड्युटी लिंकेजसह २००० किलो लिफ्ट क्षमतेसह हायड्रॉलिक्स यांची रचना शेतकऱ्यांना पूर्ण आत्मविश्वासाने मोठी अवजारे वापरण्यासाठी करण्यात आली आहे. अगदी एक्झॉस्ट सिस्टमसुद्धा दीर्घ काळ काम करताना सातत्यपूर्ण कामगिरीची सुनिश्चिती करण्यासाठी दमदारपणे डिझाइन करण्यात आली आहे.

यासोबतच, नवीन गोल्ड डीआय ५५ III ट्रॅक्टरमध्येसुद्धा नवीन सर्वात मोठे ई ३.५ इंजिन आणि १२एफ + ३आर मल्टी स्पीड ड्राईव्हलाईन लाभली आहे. त्यात कठीण ऑपरेशन्समध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी २३५ एनएम चा कमालतम टॉर्क देणारा डबल क्लच आयपीटीओ आहे. यात २,२०० किलो लिफ्ट क्षमतेसह सर्वार्थाने नवीन हायड्रॉलिक्स आणि हेवी ड्युटी लिंकेज आहेत, त्यामुळे मोठी अवजारे चालवण्यासाठी ते भविष्यानुकूलसुद्धा ठरतात. शेतकऱ्यांचा आराम हा मुख्य प्राधान्य मानून या दोन्ही ट्रॅक्टरना मस्क्युलर बिल्ट डिझाइन, सुरक्षिततेचे निदर्शक असलेले सिग्नेचर गोल्ड बॅजिंग आणि जेटलाइन थ्रॉटल, गोल्डन ग्लो हेडलॅम्प, एर्गो डेक प्लॅटफॉर्म, नेक्स्ट जनरेशन क्लस्टर आणि गॅस स्ट्रट्स असे एकत्रित वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त कार्यक्षमता लाभून या ट्रॅक्टरची मालकी अभिमानास्पद होते. नवीन गोल्ड मालिकेमागील दृष्टीचे विवेचन करताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमन मित्तल म्हणाले, आपल्या भारतीय संस्कृतीत सोने हा सुरक्षिततेचा आधारस्तंभ, स्थिरतेचे प्रतीक आहे शेतकऱ्यांना त्यांच्या ट्रॅक्टरकडून तीच खात्री मिळायला हवी. सोनालिका गोल्ड ही मालिका या तत्वज्ञानाचे मूर्त स्वरूप आहे. ही गोल्ड मालिका ३० वर्षांच्या वारशातून घडविलेली असून ती भविष्यानुकूल अभियांत्रिकीसह परिष्कृत केलेली आहे.